




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १०९ * नांदेड * शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# ‘आप’चे राज्यसभेतील १० पैकी ७ खासदार भाजपमध्ये

## राघव चढ्ढा, हरभजन सिंगसह बडे खासदार फुटले!



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** आम आदमी पक्षाचे १० पैकी ७ खासदार फुटले असून ते भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. या राघव चढ्ढा, हरभजन सिंग यासह बड्या व्यक्तींची नावे आहेत.

आम आदमी पार्टीची राघव चढ्ढा, संदीप पाठक, राजेंद्र गुप्ता, विक्रम साहनी, स्वाती मालीवाल, हरभजन सिंग, अशोक मित्तल या सात खासदारांनी साथ सोडली आहे.

या निर्णयानंतर दिल्लीत त्यांच्याकडून पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी राघव चढ्ढा बोलताना म्हणाले की, ते पक्षाच्या दोन-तृतीयांश खासदारांसह भाजपमध्ये सामील होत आहेत. संदीप पाठक आणि अशोक मित्तल यांच्यासोबत आयोजित पत्रकार परिषदेत ‘आप’चे खासदार राघव चढ्ढा म्हणाले, आम्ही, राज्यसभेतील ‘आप’चे दोन-तृतीयांश सदस्य, भारतीय संविधानातील तरतुदींचा वापर करून भाजपमध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतला आहे. ते म्हणाले, ज्या ‘आप’ला मी माझ्या रक्ताने आणि घामाने वाढवले आणि माझ्या तारुण्याची १५ वर्षे समर्पित केली, तो पक्ष आता आपली तत्त्वे, मूल्ये आणि मूळ नैतिकतेपासून भरकटला आहे. हा पक्ष आता देशाच्या हितासाठी नव्हे, तर वैयक्तिक फायद्यासाठी काम करतो. गेल्या काही वर्षांपासून मला जाणवत होते की मी चुकीच्या पक्षात योग्य व्यक्ती आहे. त्यामुळे, आज मी जाहीर करतो की मी ‘आप’पासून वेगळे होत आहे आणि जनतेच्या अधिक जवळ जात आहे.

२ एप्रिल रोजी, आपने राघव चढ्ढा यांना पक्षाच्या राज्यसभा खासदारांच्या उपनेतेपदावरून हटवले. यासंदर्भात राज्यसभा सचिवालयाला एक पत्र सादर करण्यात आले, ज्यात म्हटले आहे की त्यांना पक्षाच्या कोट्यातून बोलण्याचा वेळ देऊ नये. आपने फागवाडा येथील लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचे कुलगुरू अशोक मित्तल यांची उपनेतेपदी नियुक्ती केली. राघव हे २०२२ पासून पंजाबमधून आपचे राज्यसभा खासदार आहेत. त्यांचा कार्यकाळ २०२८ मध्ये संपेल.

यानंतर, ३ एप्रिल रोजी, राघव चढ्ढा यांनी एक व्हिडिओ प्रसिद्ध केला, ज्यात ते म्हणाले, मी संसदेत सार्वजनिक प्रश्न मांडले. हा गुन्हा आहे का? जर हे प्रश्न मांडल्याने सामान्य माणसाला फायदा झाला, तर आपचे काय नुकसान झाले? ज्यांनी आज संसदेत बोलण्याचा माझा हक्क हिरावून घेतला आणि माझा आवाज दाबला, त्यांना मला काहीतरी सांगायचे आहे. माझ्या मौनाला पराभव समजू नका. मी एक नदी आहे, जी वेळ आल्यावर पूर धारण करते.

राघव म्हणाले, अजूनही बरेच जण सामील होतील. भाजपमध्ये सामील होण्याची प्रक्रिया आज संध्याकाळी होईल. भारताच्या संविधानात अशी तरतूद आहे की, जर दोन-तृतीयांशपेक्षा जास्त खासदारांना दुसऱ्या पक्षात सामील व्हायचे असेल, तर ते तसे करू शकतात. हा अधिकार आम्हाला भारताच्या संविधानानेच दिला आहे. गेल्या काही वर्षांपासून मला असे वाटत होते की, मी चुकीच्या पक्षात योग्य व्यक्ती आहे. त्यामुळे, आज मी जाहीर करतो की, मी ‘आप’पासून दूर जात आहे आणि जनतेच्या अधिक जवळ येत आहे, असेही ते म्हणाले.

## प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम सन २०२५ मधील पिक नुकसान भरपाईसाठी

# नांदेड जिल्ह्याला ८१३.९३ कोटी मंजूर; रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होण्यास सुरुवात

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम सन २०२५ अंतर्गत ४, ३४, ८१९ शेतकऱ्यांनी ८, २९, ७३७ विमा अर्ज दाखल केले असून ५, १३, ९०० हेक्टर क्षेत्रावरील पिकांचा विमा उतरविला होता. माहे ऑगस्ट ते सप्टेंबर २०२५ मध्ये अतिवृष्टीमुळे ७, २७, ९३२ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले होते. सदर नुकसानग्रस्त पीक विमाधारक शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत नुकसान भरपाईपोटी ८१३.९३ कोटी रक्कम मंजूर झाली असून पिक विमा कंपनी मार्फत प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या पोर्टल वरून पिक विमा शेतकऱ्यांच्या खात्यात वितरणास दि.२१ एप्रिलपासून सुरुवात झाली आहे.

योजनेअंतर्गत खरीप हंगामाकरिता पीक पेरणीपासून काढणीपर्यतच्या कालावधीत विविध नैसर्गिक आपत्ती किंवा पिक उत्पादनावर विपरीत परिणाम करणाऱ्या इतर बाबींमुळे हंगामाच्या शेवटी, पीक कापणी प्रयोग आधारे/ तांत्रिक उत्पादन आधारे, सदर महसूल मंडळामध्ये पिकाच्या उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत येणारी घट गृहीत धरून नुकसान भरपाई देय असून जिल्ह्यात माहे ऑगस्ट ते सप्टेंबर २०२५ मध्ये अतिवृष्टीमुळे ७,२७,९३२ हे. क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले होते. यामध्ये सोयबीन, मुग, उडीद, पिकाचे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले होते.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत सोयबीन, मुग, उडीद, कापूस, तूर आणि ज्वारी पिके अधिसूचित असून खरीप हंगाम सन २०२५ पासून सुधारित उंबरठा उत्पन्नावर आधारित पिक विमा राबविण्यात येत आहे. सदर पिकांचे जिल्ह्यात ३३१२ पिक कापणी प्रयोग नियोजित होते. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात मोठ्याप्रमाणावर पिक नुकसान झाल्यामुळे राहुल कर्डिले जिल्हाधिकारी, नांदेड व दत्तकुमार कळसाईत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी पिक कापणी प्रयोगाचे सूक्ष्मनियोजन करून महसूल विभाग, ग्रामविकास विभाग व कृषी विभाग यांचे क्षेत्रीय अधिकारी यांच्या वेळोवेळी बैठक आयोजित करून सर्व पिक कापणी प्रयोग सीसीई मोबाईल ॲपवर होतील व वस्तुनिष्ठ होतील (पान ३ वर...)

# मागेल त्या शेतकऱ्याला कर्ज मिळाले तरच सहकार चळवळ पुढे जाईल -ना.बाबासाहेब पाटील

## भोकरमध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नवीन वास्तूचे लोकार्पण




**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., भोकर शाखेच्या नवीन वास्तूचा लोकार्पण सोहळा शुक्रवार, दि. २४ एप्रिल रोजी उत्साहात पार पडला. राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी बोलताना मागेल त्या शेतकऱ्याला कर्ज मिळाले तरच सहकार चळवळ पुढे जाईल, असे प्रतिपादन त्यांनी केले.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून पूर्वजांनी उभी केलेली सहकार चळवळ महाराष्ट्राची ओळख जगभर पोहोचवणारी ठरली आहे. सहकारी बँकांमार्फत शेतकऱ्यांना अधिकाधिक लाभ मिळणे महत्त्वाचे असून, त्यासाठी बँकांनी सक्षमपणे काम करणे गरजेचे असल्याचे मंत्री पाटील यांनी सांगितले. (पान ३ वर...)

### बँकेच्या विकासात माझाही खारीचा वाटा –खा. अशोकराव चव्हाण

माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी आपल्या भाषणात जिल्हा बँकेच्या पुनरुत्थानाचा इतिहास उलगडला. जिल्हा बँक डबघाईस आली होती. त्यावेळी मंत्रिमंडळ बँक बंद करण्याच्या विचारात होते. मात्र शेतकरी व व्यापाऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी मी बँकेला जिवंत ठेवण्याची विनंती केली आणि गॅरंटी घेतली. मुख्यमंत्री असताना १२५ कोटींच्या कर्जाचे रुपांतर अनुदानात केल्यामुळे बँक टिकली. त्यामुळे या बँकेच्या विकासात माझाही खारीचा वाटा आहे, असे ते म्हणाले.

# सरकारी कर्मचाऱ्यांचा संप अखेर मागे

**मुंबई (प्रतिनिधी)–** सुधारीत निवृत्ती वेतन योजनेसह १८ मागण्यांसाठी सरकारी कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप अखेर मागे घेण्यात आला. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासोबत झालेल्या बैठकीत दिलेल्या आश्वासनांचे इतिवृत्त मिळाल्यानंतर संप मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संपामध्ये शासकीय, निमशासकीय तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. सकारात्मक आश्वासनानंतर संप मागे घेण्याचा निर्णय समन्वय समितीकडून घेण्यात आला आहे.

सलग चार दिवस सुरू असलेल्या संपामुळे राज्यातील महसूल विभागाच्या कार्यालयावर सर्वाधिक परिणाम झाला. यामुळे मुद्रांक नोंदणीसह जमीन तसेच घर खरेदी व्यवहारांवर परिणाम झाला. त्याचप्रमाणे विवाह नोंदणीचेही काम ठप्प झाले होते. अखेर चौथ्या दिवशी या संपावर तोडगा काढण्यात राज्य सरकारला यश आले. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासोबत (पान ३ वर...)






# ‘स्थागुशा’ची जबाबदारी आता भोसले यांच्या खांद्यावर

## गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याचे आव्हान



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा पोलीस दलातील स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षकपदी अतुल भोसले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केली.


जिल्हा पोलीस दलात अत्यंत महत्त्वाची समजली जाणारी स्थानिक गुन्हे शाखेची जबाबदारी पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्यानंतर बिलोली ठाण्याचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्यावर सोपविण्यात आली आहे. जिल्ह्यात गुन्हेगारीने मोठ्या प्रमाणात डोके वर काढले असून त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी अतुल भोसले यांना चांगलीच कसरत करावी लागणार आहे. खंडेराय यांना आर्थिक गुन्हे शाखेत पाठविण्यात आले आहे. खंडेराय यांनी आपल्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात जवळपास ८० हून अधिक पिस्तूल जप्त करून अनेक टोळ्यांना जेरबंद केले होते.

अतुल भोसले हे एक अनुभवी आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखले जातात. नांदेडमध्ये नियुक्ती होण्यापूर्वी त्यांनी आपल्या कार्यकाळात महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. त्यांनी यापूर्वी नवी मुंबई, पुणे ग्रामीण, सोलापूर ग्रामीण आणि एसीबी पुणे येथे यशस्वीरित्या कार्यभार सांभाळला आहे. सोलापूर ग्रामीण येथे स्थानिक गुन्हे शाखा आणि वळसंग पोलीस ठाणे, तसेच पुणे ग्रामीणमधील दौंड आणि शिक्रापूर पोलीस ठाण्यात प्रभारी म्हणून त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. गुन्हेगारी रोखण्यासाठी भोसले यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर दिला आहे. दोन किंवा त्यापेक्षा अधिक गुन्हे असलेल्या सराईत गुन्हेगारांवर (टू प्लस वन) आरोपीवर वचक बसवण्यासाठी त्यांनी एक विशेष वेबसाईट आणि ॲप विकसित केले होते. गेल्या दोन वर्षांपासून ते नांदेड पोलीस दलात कार्यरत असून, आता स्थानिक गुन्हे शाखेची धुरा त्यांच्या खांद्यावर देण्यात आली आहे.

## शरद पवार रुग्णालयातून घरी, प्रकृती स्थिर

**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार पक्ष) अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते खा. शरद पवार यांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याने त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून प्रकृतीच्या कारणास्तव त्यांना मुंबईतील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर त्यांच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले असून, सध्या ते त्यांच्या ‘सिल्व्हर ओक’ या निवासस्थानी विश्रांती घेत आहेत.

शरद पवार यांना रुग्णालयातून सुट्टी मिळाल्याची माहिती पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी दिली. शरद पवार यांची प्रकृती आता स्थिर आहे. रुग्णालयातून डिस्चार्ज घेऊन ते आपल्या निवासस्थानी आराम करीत आहेत, असे त्यांनी सांगितले.



# आज नांदेडसह राज्यातील १६ जिल्ह्यांना येलो अलर्ट

**मुंबई (प्रतिनिधी)–** हवामान विभागाकडून आज राज्यातील नांदेडसह १६ जिल्ह्यांना येलो अलर्ट केला आहे. काही भागांमध्ये तीव्र उकाडा तर काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाची परिस्थिती निर्माण होणार आहे. हवामान विभागाने परिस्थितीचा आढावा घेत ६ जिल्ह्यांना उष्णतेचा येलो अलर्ट आणि १० जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट जारी केला आहे.


मराठवाड्यातील परभणी, नांदेड आणि लातूर या जिल्ह्यांमध्ये पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. इथे विजांसह पावसाची शक्यता असून तापमान ३३ ते ३६ अंश सेल्सिअस दरम्यान राहू शकते. यासह पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सोलापूर या पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्येही वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. कोकण विभागातील ठाणे, मुंबई आणि रायगडमध्ये उष्णतेची तीव्रता वाढणार असून तापमान ३५ ते ३८ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, धुळे, नंदुरबार आणि जळगावमध्ये उष्णतेचा पारा चढला असून हवामान कोरडे राहील. कमाल तापमान ३३-३९ अंशांच्या दरम्यान राहील.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# उष्णतेची लाट: पिकावर संकट

आजच्या काळात हवामानातील अनिश्चितता ही केवळ पर्यावरणीय समस्या राहिलेली नाही, तर ती थेट देशाच्या अन्नसुरक्षेला आणि अर्थकारणाला आव्हान देणारी गंभीर बाब ठरत आहे. उत्तर आणि मध्य भारतात उसळलेल्या तीव्र उष्णतेच्या लाटेने या संकटाची तीव्रता अधोरेखित केली आहे. ही उष्णतेची लाट केवळ ऋतुमानातील बदल नसून, शेतीप्रधान भारतासाठी धोक्याची घंटा आहे. गहू आणि तांदूळ यांसारख्या प्रमुख अन्नधान्यांच्या उत्पादनावर याचा गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गहू उत्पादनाच्या दृष्टीने पाहिले, तर त्याच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर म्हणजे दाणे भरण्याच्या काळात उष्णतेचा ताण पडल्यास उत्पादनावर मोठा परिणाम होतो. यंदा लवकर आलेल्या उष्णतेमुळे पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेश यांसारख्या प्रमुख उत्पादक राज्यांमध्ये गव्हाचे उत्पादन घटण्याची चिन्हे दिसत आहेत. काही दिवसांच्या तीव्र तापमानामुळेही गव्हाचे दाणे कोमेजतात, ज्यामुळे उत्पादनाची गुणवत्ता आणि प्रमाण दोन्ही घटते. अलीकडेच उष्णतेमुळे गव्हाच्या तुटवड्याचा सामना केलेल्या भारतासाठी ही परिस्थिती पुन्हा उद्भवणे अत्यंत चिंताजनक आहे. तांदूळ हे खरीप पीक असले, तरी तेही या हवामान बदलाच्या संकटापासून अलिप्त नाही. उष्णतेमुळे बियाण्यांची उगवण कमी होते, रोपांची वाढ मंदावते आणि पाण्याची गरज वाढते. आधीच पाण्याच्या तुटवड्याचा सामना करणाऱ्या देशात ही परिस्थिती अधिक गंभीर ठरू शकते. जास्त तापमानामुळे बाष्पीभवन वाढते, परिणामी शेतकऱ्यांना अधिक प्रमाणात भूजलाचा वापर करावा लागतो. यामुळे पाण्याचा प्रश्न अधिक बिकट होतो. विशेषतः मध्य भारतात, जिथे सिंचन व्यवस्था पुरेशी सक्षम नाही, तिथे पेरणी कमी होणे आणि उत्पादन घटणे ही शक्यता अधिक आहे. या सर्व घडामोडींचा परिणाम केवळ शेतकऱ्यांपुरता मर्यादित राहत नाही. गहू आणि तांदळाचे उत्पादन घटल्यास देशांतर्गत पुरवठा कमी होतो, ज्यामुळे अन्नधान्यांच्या किमती वाढतात आणि महागाईला खतपाणी मिळते. सरकारच्या अन्नधान्य खरेदी धोरणांवरही याचा परिणाम होतो. सार्वजनिक वितरण प्रणाली मोठ्या प्रमाणावर गहू आणि तांदळावर अवलंबून आहे. त्यामुळे उत्पादनात झालेली कोणतीही घट थेट कोट्यवधी लोकांच्या अन्नसुरक्षेला धक्का देऊ शकते. याशिवाय निर्यात धोरणांवरही मर्यादा येतात, कारण सरकारला आंतरराष्ट्रीय बांधीलकीपेक्षा देशांतर्गत गरजांना प्राधान्य द्यावे लागते. परंतु या संकटाचा सर्वात गंभीर पैलू म्हणजे आपल्या प्रणालीतील अपुरी तयारी. अनेक वर्षांपासून हवामान बदलाबाबत इशारे दिले जात असतानाही, हवामानास अनुकूल शेती पद्धतींचा विकास अपेक्षित गतीने झालेला नाही. उष्णतेला तोंड देणाऱ्या पीक जातींचा विकास, पाण्याच्या कार्यक्षम वापरासाठी आधुनिक सिंचन तंत्रज्ञान आणि अचूक हवामान अंदाज यंत्रणा या सर्व बाबींमध्ये अजूनही मोठी तफावत आहे. पीक विमा योजना ह्या फक्त नावापुरत्याच राहिल्या आहेत. त्या वेळेवर मदत देण्यात अपयशी ठरल्या आहेत. ही परिस्थिती केवळ तात्पुरत्या उपायांनी हाताळता येणार नाही. यासाठी शेती धोरणात मूलभूत बदल करण्याची गरज आहे. पाण्यावर जास्त अवलंबून असलेल्या पिकांपासून ज्वारी, बाजरी आणि कडधान्यांसारख्या कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. स्थानिक पातळीवर पाणी व्यवस्थापन सुधारण्यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. हवामानातील अस्थिरता ही आता भविष्यकाळातील धोका नसून, ती वर्तमानातील कठोर वास्तव आहे. या वास्तवाला सामोरे जाण्यासाठी सरकार, शेतकरी आणि समाज यांनी एकत्रितपणे पुढाकार घेतला पाहिजे. अन्यथा उष्णतेच्या या वाढत्या लाटा केवळ शेतीचे नुकसान करणार नाहीत, तर देशाच्या अन्नसुरक्षेलाही मोठा धोका निर्माण करतील.

# सरसेनापती उमाबाई दाभाडे






भारतीय इतिहास हा केवळ राजे-महाराजांच्या पराक्रमांनीच नव्हे, तर कर्तबगार स्त्रियांच्या धैर्य, दूरदृष्टी आणि नेतृत्वगुणांनीही समृद्ध झाला आहे. विशेषतः मराठा साम्राज्यात स्त्रियांनी पारंपरिक चौकटींपलीकडे जाऊन राजकारण, प्रशासन आणि युद्धक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावली. जिजाबाई यांनी स्वराज्याची पायाभरणी घडवून आणण्यात मोलाची भूमिका निभावली, तर ताराबाई यांनी औरंगजेबाच्या कठीण काळात राज्यकारभार समर्थपणे सांभाळला. तसेच अहिल्याबाई होळकर यांनी न्यायनिष्ठ आणि लोककल्याणकारी राज्यकारभाराचे आदर्श उदाहरण निर्माण केले, तर सईबाई व येसूबाई यांनीही संकटकाळात धैर्याने परिस्थितीला सामोरे जात आपले कर्तृत्व दाखवले. या सर्व स्त्रियांनी पुरुषप्रधान व्यवस्थेत अनेक अडचणींवर मात करत मराठा साम्राज्याच्या बळकटीकरणात आणि संवर्धनात महत्त्वाचा वाटा उचलला. त्यामुळे त्यांच्या कार्याचा अभ्यास केल्यास त्या काळातील स्त्रीशक्तीची प्रभावी जाणीव होते. अशाच तेजस्वी व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे सरसेनापती उमाबाई दाभाडे.

मराठा साम्राज्यात थेट राजकारण आणि युद्धभूमीवर सक्रिय भूमिका बजावणाऱ्या पहिल्या महिला सरसेनापती म्हणून त्यांची ओळख आजही अभिमानाने घेतली जाते. उमाबाईंचा जन्म नाशिकजवळील अभोणा या गावात एका प्रतिष्ठित सरदार घराण्यात झाला. त्यांचे वडील देवराव ठोक देशमुख हे पराक्रमी सरदार होते. आणि त्यामुळेच लहानपणापासूनच उमाबाईंच्या स्वभावात धैर्य, शौर्य आणि नेतृत्वगुणांची बीजे रोवली गेली. त्यांना घोडेस्वारी, शस्त्रविद्या आणि युद्धकलेचे प्रशिक्षण मिळाले होते. राज्यकारभारातील घडामोडींची त्यांना लहान वयातच चांगली जाण होती. त्यांचा विवाह तळेगाव येथील नामांकित सरदार खंडेराव दाभाडे यांच्याशी झाला.

मराठा साम्राज्यातील पराक्रमी सरसेनापती घराण्यांपैकी दाभाडे घराणे विशेष मानाचे मानले जाते. या घराण्यातील खंडेराव दाभाडे आणि उमाबाई दाभाडे हे दांपत्य कर्तृत्व, शौर्य आणि प्रशासनकौशल्यासाठी प्रसिद्ध होते. त्यांच्या कुटुंबाचा विस्तार मोठा असून, त्यांना एकूण सहा अपत्ये होती. या दांपत्याला तीन मुले त्र्यंबकराव, यशवंतराव आणि सवाई बाबुराव आणि तीन मुली शाहबाई, दुर्गाबाई आणि आनंदीबाई अशा संतती लाभली. यांपैकी त्र्यंबकराव दाभाडे यांनी पुढे मराठा साम्राज्यात महत्त्वाची भूमिका बजावली. दाभाडे घराण्याची परंपरा पुढे नेण्यात या संततीचा वाटा महत्त्वाचा होता.

दाभाडे घराणे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळापासून मराठा सैन्यात कार्यरत होते. खंडेराव दाभाडे हे अत्यंत शूर आणि यशस्वी सेनापती होते. तर इ.स. १७१० मध्ये उमाबाई दाभाडे यांनी धार्मिक व सामाजिक कार्याची जाणीव ठेवून नाशिकजवळील सप्तशृंगी देवी मंदिर येथे जाणाऱ्या भाविकांसाठी महत्त्वाचे कार्य केले. त्या काळी डोंगरावर असलेल्या या मंदिरापर्यंत पोहोचणे अत्यंत कठीण होते. ही अडचण लक्षात घेऊन उमाबाईंनी डोंगर चढण्यासाठी सुमारे ४७० पायऱ्या बांधून घेतल्या. या उपक्रमामुळे भाविकांना मंदिरापर्यंत पोहोचणे अधिक सोयीचे झाले आणि त्यांच्या धार्मिक कार्यातून समाजहिताची जाणीवही स्पष्टपणे दिसून येते. उमाबाईंच्या या कार्यामुळे त्या केवळ पराक्रमी योद्धाच नव्हे, तर जनकल्याणाची जाणीव असलेल्या नेत्या म्हणूनही ओळखल्या गेल्या. छत्रपती शाहू महाराज यांनी १७१७ साली त्यांची सेनापती म्हणून नियुक्ती केली होती. अशा बलाढ्य सेनापतीच्या पत्नी म्हणून उमाबाईंनी घराण्याचा मान पुढे नेला.

१७२९ साली खंडेराव दाभाडे यांचे निधन झाले आणि त्यानंतर त्यांच्या ज्येष्ठ पुत्र त्रिंबकराव दाभाडे यांच्यावर जबाबदारी आली. परंतु १७३१ मधील डभईची लढाई या युद्धात त्रिंबकराव यांचा मृत्यू झाला. या दुहेरी आघातानंतर उमाबाईंवर संपूर्ण कुटुंब, वतन आणि सैन्याची जबाबदारी आली. त्या काळात स्त्रीने अशी जबाबदारी स्वीकारणे अत्यंत कठीण मानले जात होते, पण उमाबाईंनी ती समर्थपणे पार पाडली. त्रिंबकराव यांच्या मृत्यूनंतर दाभाडे घराण्याची पकड गुजरातवर कमी झाल्याचे पाहून मारवाडचा राजा अभयसिंह याने संधी साधण्याचा प्रयत्न केला. त्याने मुघलांची मदत घेऊन बडोदा आणि डभई प्रांतावर आक्रमण केले. या लढाईत उमाबाईंचे सरदार पिलाजी गायकवाड वीरमरण पावले. अनेकांनी असा समज करून घेतला की, उमाबाई आता माघे हटतील. मात्र त्यांनी संकटांना न जुमानता स्वतः रणांगणात उतरण्याचा निर्णय घेतला. हत्ती-वरील हौद्यातून सैन्याचे नेतृत्व करत, तीर-कामठा हातात घेऊन उमाबाईंनी अभयसिंहावर थेट हल्ला चढवला. त्यांच्या नेतृत्वाखाली मराठा सैन्याने जबरदस्त पराक्रम गाजवला आणि अभयसिंहाला गुजरातमधून पळ काढावा लागला. या विजयाने उमाबाईंच्या धैर्याची आणि नेतृत्वाची साक्ष दिली. यानंतर उमाबाईंनी अहमदाबादवर स्वारी केली. मुघल सरदार जोरावर खान बाबी याने त्यांना कमी लेखत अपमानास्पद पत्र पाठवले होते. मात्र उमाबाईंनी रणांगणात आपल्या शौर्याने त्याला उत्तर दिले.

मराठा सैन्याने जोरदार हल्ला करून अहमदाबाद जिंकले. या विजयामुळे उमाबाईंचा दरारा अधिक वाढला. उमाबाईंच्या पराक्रमाने प्रभावित होऊन छत्रपती शाहू महाराज यांनी त्यांचा विशेष सन्मान केला आणि त्यांच्या पायात सोन्याचे तोडे घातले. हा सन्मान अत्यंत मानाचा समजला जातो. मात्र शाहू महाराजांच्या निधनानंतर मराठा साम्राज्यातील राजकीय समीकरणे बदलली. नानासाहेब पेशवे यांच्या नेतृत्वाखाली पेशवाई बळकट होत होती. दाभाडे आणि पेशवे यांच्यातील मतभेद वाढू लागले.

उमाबाईंनी आपला मुलुख वाचवण्यासाठी अनेक प्रयत्न केले. त्यांनी वाटाघाटीही केल्या, पण त्यात यश आले नाही. उमाबाईंनी आपली भूमिका ठाम ठेवत, पेशव्यांना आपला प्रदेश देण्यास नकार दिला. त्यांनी रामराजे भोसले यांच्याशी हातमिळवणी केली आणि दामाजी गायकवाड यांना पेशव्यांविरुद्ध पाठवले. परंतु या संघर्षात दामाजी गायकवाड यांचा पराभव झाला आणि १७५१ साली तह करावा लागला. यानंतर उमाबाई आणि त्यांच्या कुटुंबियांना पेशव्यांनी कैद केले. त्यांना पुणे आणि सिंहगड किल्ला येथे नजरकैदेत ठेवण्यात आले. पुढे १७५२ मध्ये झालेल्या तहानंतर त्यांचा सरंजाम परत करण्यात आला आणि संबंध सुधारले.

जीवनाच्या अखेरीस उमाबाईंची प्रकृती खालावली. मुठा नदीच्या काठी त्यांच्यावर उपचार करण्यात आले. अखेर नोव्हेंबर १७५४ मध्ये त्यांनी देह ठेवला. तळेगाव येथे त्यांच्या स्मृतीस्थळाची उभारणी करण्यात आली. उमाबाई दाभाडे यांचे जीवन हे संघर्ष, शौर्य आणि नेतृत्त्वाचे अद्वितीय उदाहरण आहे. त्यांनी केवळ घराण्याची परंपरा जपली नाही, तर पुरुषप्रधान समाजात स्वतःचे स्वतंत्र अस्तित्त्व सिद्ध केले. युद्धभूमीवर तलवार हातात घेऊन लढणारी आणि राजकारणात कुशलतेने निर्णय घेणारी ही स्त्री आजही प्रेरणास्थान आहे. इतिहासात उमाबाई दाभाडे यांचे स्थान अत्यंत मानाचे असून, त्यांच्या कार्यामुळे स्त्रीशक्तीचा प्रभावी संदेश समाजाला मिळतो. त्याचा जीवन संघर्ष म्हणजे सामना करताना धैर्य, आत्मविश्वास आणि चिकाटी किती महत्त्वाची असते, हे दाखवणारी यशोगाथा आहे.

**-डॉ. दीपाली पांडे देशमुख**
पू. अहिल्यादेवी होळकर
महाविद्यालय राणी सावरगाव

# हिवतापाची लक्षणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना



भारत सरकारच्या ध्येय-धोरणानुसार राष्ट्रीय हिवताप दुरीकरण कार्यक्रम सन २०३० पर्यंत हिवताप दुरीकरण ध्येय साध्य करावयाचे असल्याने त्याबाबतचे ध्येय व नियोजन करावे. याकरिता सदर मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. डॉ. संदीप सांगळे, सह संचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग) पुणे -६ यांनी दि. ७ एप्रिल २०२६ रोजी पत्र निर्गमित करून ई-मेलद्वारे कळविले आहे. राज्यात जागतिक हिवताप दिन दि. २५ एप्रिल २०२६ रोजी साजरा करणे व जनतेमध्ये हिवताप विषयी जनजागृती करणे आहे. राज्यस्तरावर राज्य किटकशास्त्रज्ञ डॉ महेंद्र जगताप, डॉ. सोमाजी अनुसे यांचे नियोजन व मार्गदर्शनानुसार जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

नांदेड जिल्हा आरोग्य विभाग डॉ. संजय पेरके, जिल्हा शल्य चिकित्सक नांदेड, डॉ. संतोष सूर्यवंशी जिल्हा आरोग्य अधिकारी नांदेड, डॉ. राजाभाऊ बुट्टे निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य) जिल्हा रुग्णालय नांदेड, डॉ. शिवशक्ती पवार, डॉ अमृत चव्हाण जिल्हा हिवताप अधिकारी नांदेड, डॉ. प्रताप चव्हाण वैद्यकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय भोकर यांच्या मार्गदर्शनानुसार नांदेड जिल्ह्यात व भोकर शहरात ही जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य विस्तार अधिकारी, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, आरोग्य निरीक्षक, आरोग्य सहायिका, आरोग्य कर्मचारी, आरोग्य सेविका, क्षेत्र कर्मचारी, अंगणवाडी व आशाताई हे काम करत आहेत व किटकजन्य आजारावर नियंत्रण ठेवत आहेत. सर्वांनी एकाच वेळी एक दिलाने प्रयत्न केले तर हिवतापाच्या लढाईत हिवतापाचा पराभव होईल. या दृष्टीने जागतिक आरोग्य संघटनेने दि. २५ एप्रिल हा दिवस जागतिक हिवताप दिन म्हणून घोषित केलेले आहे. भविष्यात या आजाराचा उद्रेक होवू नये म्हणून वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याच्या दृष्टीने थोडक्यात माहिती.

घोषवाक्य घेऊन जागतिक हिवताप दिन साजरा करीत असताना त्या काळची आठवण झाली तेव्हा सहज लोक उपहासात्मक बोलायचे की, एक मच्छर आदमी को... बना देता है. हिवताप अर्थात मलेरिया मले एरिया (मध्ययुगीन इटालियन मधील खराब वायू) पासून हे नाव मलेरियाच्या लक्षणानुसार प्राप्त झाले ही कल्पना प्राचीन रोमनांकडून आली होती ज्यांनी असा विचार केला की, हा रोग भयानक धुळीपासून आला आहे. तसा मलेरिया हा आजार फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. खिस्तपूर्व पाचव्या शतकात हिपोक्रॅटिस यांना मलेरियासदृश्य आजार माहीत होता. हिवतापाच्या लक्षणाने त्याकाळात लाखो लोकांचे मृत्यू होत असत. लोक लक्षणानुसार उपलब्ध उपचार करीत असत. पुढे शतकानुशतके पूर्ण जगात हीच परंपरा सुरु होती. या आजाराचे कारण त्या काळात कोणासही कळत नव्हते. तेव्हा इ.स. १८८० मध्ये लेव्हेरान यांनी मलेरिया निर्माण करणाऱ्या डासांचा शोध लावला, परंतु या डासाचे प्रामुख्याने जे तीन प्रकार आहेत त्यांचा शोध त्यावेळी लागला नव्हता. इ.स. १८९४ मध्ये मॅनसन यांनी असे गृहीतक मांडले की मलेरिया हा रोग डासांमुळे होत असून, तो या जंतूंनी युक्त पसरवीत असावेत अशा घटना सुरु असतांना आपल्या भारतात सन १३ मे १८५७ अलमोडा उत्तर भारत प्रदेश नेपाळ सिमेवर सर रोनाल्ड रॉस यांचा जन्म झाला. त्यांचे वडील लष्करात अधिकारी होते, त्यांचे प्राथमिक शिक्षण भारतात पूर्ण करुन ते पुढे वैद्यकिय शिक्षणासाठी इंग्लडमध्ये गेले पुढे एम.बी.बी.एस पूर्ण करुन भारतात इंडीयन मेडीकल सर्विसमध्ये वैद्यकीय अधिकारी पदावर चेन्नई येथे रुजू झाले. त्या काळात हिवतापसदृश्य आजाराने भारतात देखील थैमान घातलेले होते. या आजाराच्या संशोधनासाठी ते पुन्हा इंग्लड येथे गेले. त्या ठिकाणी डॉ. मेन्सन पॅट्रीक व डॉ. लॉथरन हे त्या ठिकाणी मलेरियावर संशोधन करीतच होते. तेथे प्राथमिक संशोधन करुन पुन्हा भारतात सिकंदराबाद येथील छावणीत नोकरी स्वीकारुन मलेरियावर संशोधन सुरु ठेवले तेव्हा सिकंदराबाद येथील बेगमपेठ येथे त्यांना तपकिरी रंगाचे डास (अर्थात अँनॉफीलीस) सापडले तेव्हा त्यांनी २० ऑगस्ट १८९७ ला जगासमोर (ब्रिटीश मेडीकल जनरल) निश्चित कारण ठेवले की हिवताप हा आजार अँनाफीलीस नावाच्या डासामुळे नेमका कसा होतो व पुढे सन १९०० मध्ये मलेरियावर उपचारासाठी शिकोना या झाडापासुन क्युनाईन नांवाचे औषण तयार केले याच कारणास्तव सर रोनाल्ड रॉस यांना सन १९०२ मध्ये त्यांना नोबेल पुरस्काराने मन्मानीत करण्यात आले.

इस १९०० मध्ये आपणास माहीत होते मलेरियाचे कारण पुढे यावर सतत संशोधन सुरु होते. भारतात देखील हा आजार आटोक्यात येत नव्हता. मलेरीयाच्या साथी होत असत व असंख्य बळी जात असत. तसेच मलेरीयाचे जे दुष्परीनाम वेगवेगळ्या वयोगटातील दिसून येत ते काही कमी होत नव्हते. स्वातंत्र्यानंतर हिवतापाचे अंदाजे वार्षिक प्रमाण ७५ दशलक्ष होते आणि ०.८ दशलक्ष लोक मृत्युमुखी पडले अशा गंभीर समस्याचा सामना करीत असतांना तेव्हा पुढे भारत सरकारने प्रथमतः १९५३ मध्ये राष्ट्रीय मलेरिया नियंत्रण कार्यक्रम सुरु केला.

हिवताप या आजाराचा प्रसार अँनाफिलस डासाच्या मादीमार्फत होतो. या डासाची उत्पत्ती स्वच्छ साठवून राहिलेल्या पाण्यात होते. उदा.भात शेती, स्वच्छ पाण्याची डबकी, नाले, नदी पाण्याच्या टाक्या, कालवे ईत्यादी मध्ये होते. या आजाराचे लक्षणे थंडी वाजून ताप येणे, ताप हा सततचा असू शकतो किंवा एक दिवस आड येवू शकतो, ताप नंतर घाम येवून अंग गार पडणे, डोके दुखणे व बऱ्याच वेळा उलट्या होतात. या आजाराचे निदान हे प्रयोगशाळेत रक्त नमुना तपासणी करून करता येते. तात्काळ निदान पध्दती आर.डी.के. (Rapid Dignostic Kit) द्वारे स्पॉटवर रक्त नमुना घेऊन पी.एफ./ पी.व्ही. हिवतापाचे त्वरीत निदान करता येते. कोणताही ताप हा हिवताप असू शकतो. म्हणून प्रत्येक ताप रुग्णाने आपला रक्तनमुना नजिकच्या ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रात जावून तपासून घ्यावे. हिवताप दुषित रक्तनमुना आढळून आल्यास वैद्यकीय अधिकारी यांच्या सल्ल्याने दिल्या जाणाऱ्या क्लोरोक्विन व प्रायमाक्विन गोळयाचा औषधोपचार घ्यावा.

हिवताप हा प्लाझमोडीयम या परोपजीवी जंतूपासून होतो. जगामध्ये दरवर्षी सर्वसाधारणपणे ३०० ते ५०० दशलक्ष लोकांना हिवताप होतो. हिवतापाच्या जंतूचे फॅल्सीफरम व व्हायव्हॉक्स हे दोन प्रकार प्रामुख्याने आढळून येतात. हिवतापाचा प्रसार अँनाफिलीस डासाच्या मादीमार्फत होतो. हिवतापाचा अधिशयन काळ हा १० ते १२ दिवसाचा आहे.

(१) हिवताप (Malaria) - लक्षणे :- थंडी वाजून ताप येणे. ताप हा सततचा असू शकतो किंवा एक दिवसाआड येऊ शकतो. नंतर घाम येऊन अंग गार पडते. ताप आल्यानंतर डोके दुखते.बऱ्याच वेळा उलट्याही होतात.

(२) मेंदूचा हिवताप ( उशीशलीश्र चरश्ररीळर) - फॅल्सीफेरम प्रकारच्या हिवतापात वेळेवर योग्य उपचार न मिळाल्यास मेंदूचा हिवताप होऊ शकतो.

**लक्षणे :** तीव्र ताप, तीव्र डोकेदुखी / व उलट्या होणे. मान ताठ होणे. झटके येणे, बेशुद्ध होणे.

**रोगनिदान** -१) प्रयोगशाळेत रक्त नमुना तपासणी करून घेणे.

२) तत्काळ निदान पद्धती (Rapid Diagnostic Kit) हिवतापाचे खात्रीशीर निदान हे रुग्णाचा रक्तनमुना तपासून करता येते. वरील रोगाची लक्षणे असलेल्या व्यक्तीच्या अशा रक्त नमुन्यात हिवतापाचे जंतु आढळून येतात. रोगजंतूची माहिती - रोग प्रसार कसा होतो.

हिवतापाचा प्रसार अँनाफिलीस जातीच्या मादी डासांमार्फत होतो. या डासांची उत्पत्ती स्वच्छ साठून राहिलेल्या उदा. स्वच्छ पाण्याची डबकी, भात शेती, नाले , नदी, पाण्याच्या टाक्या इ. मध्ये होते. डास हिवताप रुग्णास चावतो त्यावेळेस रक्ताबरोबर हिवतापाचे जंतू डासाच्या पोटात जातात. तेथे वाढ होऊन ते जंतु डासाच्या लाळेवाटे निरोगी मनुष्याच्या शरीरात सोडले जातात. मनुष्याच्या शरीरात हे जंतू लिव्हर मध्ये जातात तेथे त्यांची वाढ होऊन १० ते १२ दिवसांनी मनुष्याला थंडीवाजुन ताप येतो.

**प्रतिबंधात्मक उपाययोजना**

हिवताप प्रसारक अँनाफिलीस डासांची उत्पत्ती स्वच्छ पाण्यात होते. डास स्वच्छ पाण्यात सुमारे १५० - २०० अंडी घालतात. अंडी, अळ्या, कोष, प्रौढ डास हे डासाचे जीवन चक्र आठ ते दहा दिवसात पूर्ण होते. म्हणून डास उत्पत्ती थांबवण्यासाठी नागरिकांनी खालील उपाय योजना केल्या पाहिजेत.

पाणी साठविण्याची भांडी घट्ट झाकून ठेवा. आठवड्यातून एकदा सर्व पाणी साठे आतून घासून-पुसून कोरडे करा व दुसऱ्यादिवशी पाणी भरा. नारळाच्या करवंट्या, टायर, बाटल्या व प्लास्टिक डबे नष्ट करा व यामध्ये पाणी साठा होऊ देऊ नका.

झोपताना मच्छरदाणीचा वापर करा किंवा डासांना पळून लावणाऱ्या अगरबत्या, मॅटचा वापर करा. घराभोवतीचा परिसर स्वच्छ ठेवा. सांडपाण्याची विल्हेवाट शोषखड्ड्यातून लावा. परसबाग फुलवा. घराच्या परिसरातील डबकी बुजवा किंवा वाहती करा. घराच्या खिडक्यांना जाळ्या बसवा. मोठ्या पाणीसाठ्यामध्ये गप्पी मासे सोडा. सेप्टी टँक च्या व्हेटपाईपला वरच्या बाजूला नायलॉन जाळी बसून घ्या व डास उत्पत्ती थांबवा. नेहमी पूर्ण बाह्याचे कपडे घालावेत. आपल्या घराभोवताली पाणी साचू देऊ नका.

अंगण व परिसरातील खड्डे बुजवावेत त्यात पाणी साचणार नाही याची खबरदारी घ्यावी. झोपतांना पूर्ण अंगभर कपडे घालावे, पांघरून घेऊन झोपावे. संध्याकाळी ६ ते ८ दरम्यान दारे खिडक्या बंद कराव्यात, खिडक्यांना जाळया बसवाव्यात, झोपतांना भारीत मच्छरदाणीचा वापर करावा. आपल्या घरी किटकनाशक औषधीचे फवारणी पथक आल्यास आपले घर संपूर्ण फवारून घ्यावे.फवारलेले घर किमान २ ते २.५ महिने सारवू (रंगरंगोटी) करू नये. घराच्या छतावरील फुटके डब्बे, टाकाऊ टायर्स, कप, मडकी, ईत्यादी ची वेळीच विल्हेवाट लावा, संडासच्या व्हेंट पाईपला वरच्या टोकाला जाळी किंवा पातळ कपडा नेहमी बांधावा, तर आठवड्याला नाल्यामध्ये रॉकेल किंवा टाकाऊ ऑईल टाकावे.

वरील दक्षता प्रत्येकाने घेतल्यास डासाची उत्पत्ती होणार नाही व डास चावणार नाही. म्हणजे योग्य काळजी व वेळीच केलेला उपचार तुम्हाला होणाऱ्या आजारापासून दुर ठेवील त्यासाठी किटकजन्य आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वांनी हातभार द्व लावावा असे आवाहन नांदेड जिल्हा आरोग्य विभागाकडून मा.डॉ संजय पेरके साहेब, जिल्हा शल्य चिकित्सक नांदेड, मा. डॉ. संतोष सूर्यवंशी सर जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड, डॉ राजाभाऊ बुट्टे निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य) जिल्हा रुग्णालय नांदेड, डॉ शिवशक्ती पवार सर नांदेड, मा. डॉ अमृत चव्हाण साहेब जिल्हा हिवताप अधिकारी नांदेड, डॉ प्रताप चव्हाण सर वैद्यकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय भोकर यांनी केले आहे.

**-सत्यजीत टिप्रेसवार,**
आरोग्य निरीक्षक,
ग्रामीण रुग्णालय भोकर, जि.नांदेड.
मो. ९४२३०३०९९६

# पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाचे मटका अड्ड्यांवर छापे; दहा आरोपींविरुद्ध कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)**– परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी परभणी शहरात पोलीस पथकाची रवानगी केली होती. या पथकाने दि. २३ एप्रिल रोजी परभणी शहरातील नानलपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत जनता मार्केट व जुना मोंढा या ठिकाणी शटरमध्ये चालू असलेल्या मटका बुकीवर कारवाई करीत २४ हजार ९९० रुपयांची रोकड व २५ हजार रुपयांचे ५ मोबाईल जप्त केले आहेत. या प्रकरणात एकूण ६ आरोपीतांविरुध्द नानलपेठ पोलीस ठाणे येथे गुरनं ३०२/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्याअन्वये गुन्हा नोंदवून, त्याचा तपास नानलपेठ पोलीस ठाण्यातील पोहेकॉ/ईश्वर रासवे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.




त्यानंतर पोलीस ठाणे कोतवाली हद्दीत असणाऱ्या स्मशानभूमी रोडवरील एम. आर. हॉटेल या ठिकाणी शटरमध्ये चालू असलेल्या मटका बुकीवर कारवाई करीत ७ हजार ९२० रुपयांची रोकड व ११ हजार रुपयांचे २ मोबाईल जप्त केले असून, या प्रकरणात एकूण ४ आरोपीतांविरुध्द कोतवाली पोलीस ठाणे येथे गुरनं १९२/२०२६ कलम ४९ बी.एन.एस. सह १२ (अ), महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदवून, त्याचा तपास कोतवाली पोलीस ठाण्यातील पोहेकॉ. ताटीकुंडलवार यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

उपरोक्त दोन्ही कारवायांत, पोलीस पथकाने एकूण ३२ हजार ९१० रुपयांची रोकड, ७ मोबाईल व साहित्य असा एकूण ६८ हजार ९१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, एकूण १० आरोपीतांविरुद्ध गुन्हे नोंद केले आहेत.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ. प्रदीप खानसोळे, पोहेकॉ. संजीव जिंकलवाड, पोकॉ. गणेश धुमाळ व पोकॉ. कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांकडे पोहोचाविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाईन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, या क्रमांकावर फोन करून अथवा व्हॉट्सअप मेसेज द्वारे पाठवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

## स्वयंरोजगार मेळाव्याचे ३० एप्रिल रोजी आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील शेतकरी, लघुउद्योजक, सुशिक्षित बेरोजगारांना स्वावलंबी बनविण्यासाठी आणि त्यांना स्वत:चा व्यवसाय सुरु करण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत असलेले इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाज्योती आणि वनार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली या जिल्ह्यातील लाभार्थ्यांकरिता नांदेड येथील शंकरराव चव्हाण सभागृहात गुरुवार, दि. ३० एप्रिल रोजी सकाळी १० वा. कर्ज वाटप व स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यात महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाज्योती व वनार्टी या महामंडळाच्या कर्ज वाटप व प्रशिक्षण योजनांबाबत ऑनलाईन अर्ज कसा करावा, अर्जाकरीता आवश्यक कागदपत्रे कोणती आणि अर्जातील त्रृटी कशा टाळाव्यात याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# भोकर परिसरात आरोग्य विभागाची व्यापक मोहीम; जनजागृतीवर भर

**भोकर (प्रतिनिधी)**– भोकर परिसरात आरोग्य विभागाची व्यापक मोहीम राबविण्यात येणार असून, या मोहिमेंतर्गत जनजागृती करण्यात येणार आहे.

यंदा शनिवार, दि. २५ एप्रिल रोजी 'जागतिक हिवताप दिन' साजरा केला जात आहे. भारत सरकारने सन २०३० पर्यंत देश हिवतापमुक्त करण्याचे ध्येय निश्चित केले असून, त्या अनुषंगाने नांदेड जिल्ह्यात आणि भोकर परिसरात आरोग्य विभागातर्फे व्यापक मोहीम हाती घेण्यात आली आहे.

राज्याचे आरोग्य सेवा सहसंचालक डॉ. संदीप सांगळे (पुणे) यांनी ७ एप्रिल रोजी निर्गमित केलेल्या पत्राद्वारे राज्यभर मोहिमेचे आदेश दिले आहेत. लातूर विभागीय उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड, सहाय्यक संचालक डॉ. बरुरे बी. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर विभागात काम सुरू आहे. नांदेड जिल्ह्यात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुट्टे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. अमृत चव्हाण आणि भोकर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रताप चव्हाण, आरोग्य निरीक्षक सत्यजित टिप्रेसवार यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य यंत्रणा सज्ज झाली आहे.

या मोहिमेत आरोग्य सहायक, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, आशा स्वयंसेविका आणि अंगणवाडी सेविका या प्रत्यक्ष क्षेत्रात उतरून काम करत आहेत. नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळेच आपण हिवतापाचा पराभव करू शकू,

### आरोग्य विभागाचे आवाहन व उपाययोजना

हिवताप हा प्लाझमोडीयम परोपजीवी जंतूंमुळे होतो. डास चावल्यानंतर साधारण १० ते १२ दिवसांनी थंडी वाजून ताप येणे, डोकेदुखी आणि उलट्या होणे अशी लक्षणे दिसतात. यावर मात करण्यासाठी आरोग्य विभागाने पुढील उपाय सुचवले आहेत. पाणी साठे व्यवस्थापन: ड्रम, टाक्या व इतर भांडी आठवड्यातून एकदा घासून कोरडी करावीत (कोरडा दिवस पाळावा). परिसर स्वच्छता: घराभोवतालची डबकी बुजवावीत किंवा वाहती करावीत. टायर, नारळाच्या करवंट्या, प्लास्टिक कचरा यांची विल्हेवाट लावावी. वैयक्तिक सुरक्षा: झोपताना मच्छरदाणीचा वापर करावा, खिडक्यांना जाळ्या बसवाव्यात आणि शक्यतो पूर्ण बाह्यांचे कपडे वापरावेत.

मोफत सेवा उपलब्ध: हिवतापाचे निदान करण्यासाठी 'आर.डी.के.' (Rapid Diagnostic Kit) द्वारे तत्काळ तपासणीची सोय सर्व सरकारी रुग्णालयांत उपलब्ध आहे. कोणताही ताप हा हिवताप असू शकतो, त्यामुळे घरगुती उपचार न करता जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात किंवा ग्रामीण रुग्णालयात जाऊन मोफत रक्ताची तपासणी व औषधोपचार घ्यावेत, असे आवाहन नांदेड जिल्हा आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे.

या मोहिमेत आरोग्य सहायक, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, आशा स्वयंसेविका आणि अंगणवाडी सेविका या प्रत्यक्ष क्षेत्रात उतरून काम करत आहेत. नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळेच आपण हिवतापाचा पराभव करू शकू, असा विश्वास आरोग्य प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## अभियंता भरतकुमार कानिंदे यांना महाराष्ट्र समाजरत्न गौरव पुरस्कार जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)**– किल्ले पर्यटन महोत्सव फाऊंडेशन, महाराष्ट्र स्टार ग्लोबल कॉन्फरन्स ॲन्ड अवार्ड सेरेमनी छत्रपती संभाजी नगरच्या वतीने मानाचा पुरस्कार सामाजिक व विविध क्षेत्रातील लोकोपयोगी कामांची दखल घेऊन अभियंता भरतकुमार कानिंदे यांना महाराष्ट्र समाजरत्न गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



हा पुरस्कार मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी सभागृह छत्रपती संभाजीनगर येथे शनिवार, दि. २५ एप्रिल रोज मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

# नांदेड नगरीत गझलोन्मेष आयोजित गझलोत्सव गाजला

**नांदेड (प्रतिनिधी)**– तरुणाईला गझलांची गोडी लागावी तसेच नांदेड व परिसरातील गझल चळवळ सक्रीय व गतिमान करण्याच्या हेतूने रविवार, दि.१९ एप्रिल २०२६ रोजी गझलोन्मेष समूह नांदेड आयोजित गझलकार स्व. संजयकुमार बामणीकर व लोकगायक का. देवराव कदम स्मृती सन्मान सोहळा तथा गझलोत्सव २०२६ नुकताच हॉटेल विसावा पॅलेस, शिवाजीनगर, नांदेड येथे उत्साहात पार पडला.



परभणी जिल्ह्यातील पालम येथील सुप्रसिद्ध गझलकार आत्तम वामनराव गेंदे यांना गझलकार स्व. संजयकुमार बामणीकर गझलप्रतिभा सन्मान २०२६ व नागपूर येथील प्रसिद्ध गझल गायक संकेत नागपूरकर यांना लोकगायक का. देवराव कदम गझलसूर सन्मान २०२६ ज्येष्ठ गझलकार प्रफुल्ल कुलकर्णी, बापू दासरी, डॉ. संतोष कुलकर्णी, बालाजी इबीतदार, मीनल वसमतकर, शिवराज बामणीकर, संभाजीराव कदम आदी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

नांदेडमधील स्थानिक तसेच निमंत्रित गझलकारांच्या चार मुशायऱ्यांना गझलकारांच्या बहारदार सादरीकरण व रसिकांच्या उत्स्फुर्त प्रतिसादामुळे चार चाँद लागले. गझलोन्मेष आयोजित सन्मान सोहळा व गझलोत्सवाचे पहिलेच वर्ष असूनही महाराष्ट्रातील नामवंत गझलकारांच्या सहभागामुळे कार्यक्रम बहारदार झाला. शेखर गिरी, दिवाकर जोशी, बापू दासरी, मीनल वसमतकर यांच्या अध्यक्षतेखाली रंगलेल्या गझल मुशायऱ्यांचे दीपाली कुलकर्णी, डॉ. स्वाती भद्रे-आकुसकर, रोहिणी पांडे व विजय धोबे यांनी बहारदार सूत्रसंचालन केले.

# पूरग्रस्त भागातील तरुणांसाठी नाविन्यपूर्ण ड्रोन पायलट प्रशिक्षण

**नांदेड (प्रतिनिधी)**– पूरग्रस्त भागातील तरुणांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संस्कृती संवर्धन मंडळ, सगरोळी यांच्या विशेष पुढाकारातून एक नाविन्यपूर्ण उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आला. या अंतर्गत उद्यमिता लर्निंग सेंटर येथे पूरग्रस्त भागातील २० तरुणांना ड्रोन पायलट प्रशिक्षण देण्यात आले.



मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे मुखेड तालुक्यातील अनेक गावे पाण्याखाली गेली होती. या नैसर्गिक आपत्तीमुळे स्थानिक नागरिकांचे जनजीवन मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाले. या पार्श्वभूमीवर प्रभावित तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी संस्कृती संवर्धन मंडळाने जिल्हाधिकाऱ्यांकडे विशेष पाठपुरावा केला होता. त्यांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे हा उपक्रम प्रत्यक्षात साकार झाला.

या प्रशिक्षणामध्ये हसनाळ, रावणगाव, भिंगोली आणि भाटापूर या गावांतील एकूण २० तरुणांनी सहभाग घेतला. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर सर्व प्रशिक्षणार्थ्यांना डीजीसीएकडून १० वर्षांसाठी ड्रोन ऑपरेटर परवाना प्रदान करण्यात आला आहे. अशा प्रकारचा नाविन्यपूर्ण उपक्रम जिल्ह्यात पहिल्यांदाच घेण्यात आला आहे.

प्रशिक्षणानंतर संबंधित तरुणांना ड्रोन पायलट म्हणून रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, यासाठी त्यांना दक्ष RPTO कडून मार्गदर्शन देखील दिले जाणार आहे. याशिवाय, ड्रोनद्वारे शेती फवारणीसारखा स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्याची संधीही त्यांना प्राप्त झाली आहे.

ग्रामीण भागातील तरुणांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रोजगारक्षम बनविण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा हा विशेष उपक्रम आहे.

## माजी सरपंच सुदिन पाटील बागल यांच्यावतीने काकांडी येथे पाणपोई



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– उन्हाळ्याच्यी तीव्रता पाहता माजी सरपंच सुदिन बागल यांनी नांदेड-हैद्राबाद रोडवरील काकांडी येथे थंड पाणपोई सुरू केली असून, वाहनधारकांसह या मार्गावरून ये-जा करणाऱ्या नागरीक या पाणपोईचा लाभ घेत आहेत.

सुदिन पाटील बागल यांनी काकांडी येथे २१ एप्रिल रोजी सुरू केलेल्या या पाणपोईचे उद्घाटन शिवसेनेचे नांदेड तालुका प्रमुख उद्धव पाटील शिंदे, बळीरामपूरचे माजी सरपंच अमोल गोडबोले, शिवशक्ती महाविद्यालयाचे मुख्याध्यापक पवार, कोल्हे, काकांडीचे शिवसेना शाखा प्रमुख रावसाहेब बंडे, बाळू मंदवाड, मोतीराम कोंके, सुदर्शन कोंके, काळेश्वर बागल, नाना पाटील बागल, काशिनाथ बागल, भानुदास बागल यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# खाजगी विद्यार्थ्यांचे दहावी-बारावी परीक्षेसाठी नावनोंदणी अर्ज सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२ वी) परीक्षासाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं. १७ भरून परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

अनेक शाळाबाह्य विद्यार्थी पात्र असूनही मंडळाने दिलेल्या मुदतीत नावनोंदणी अर्ज भरू न शकल्याने अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जावू नये म्हणून जून-जुलै २०२५ च्या परीक्षांसाठी खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होण्याकरिता नाव नोंदणीसाठी संधी देण्यात आली होती.

त्यानुसार जून-जुलै २०२६ च्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेसाठी शाळाबाह्य खाजगी विद्यार्थ्यांकरिता सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मंडळाच्या अटी व शर्तीनुसार नावनोंदणी करण्याकरिता उपलब्ध आहेत. यासंदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक पुस्तिका मंडळाच्या http://www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच अधिक माहितीसाठी सर्व विद्यार्थी, शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या कार्यकक्षेतील विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

जून-जुलै २०२६ परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन नावनोंदणी अर्जाबाबतची कार्यवाही दिनाक २२ एप्रिल २०२६ पासून सुरु करण्यात आली असून, सदरील अर्ज मंडळाच्या संकेतस्थळावरून भरावयाचे आहेत.

जून - जुलै २०२६ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत.

विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन अर्जाची प्रत (print out), ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोच पावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत, कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे यासाठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्वीकारण्याची मुदत बुधवार २२ एप्रिल २०२६ ते गुरुवार २१ मे २०२६ पर्यंत राहील.

खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होण्यासाठी फेब्रु मार्च २०२६ च्या परीक्षेच्यावेळी ज्या अटी व शर्ती निर्धारित केलेल्या होत्या त्याच अटी व शर्ती जून-जुलै २०२६ च्या परीक्षेसाठी कायम राहतील. सदर अर्ज फक्त नियमित शुल्काने घ्यावयाचे असून याकरिता विलंब, अतिविलंब शुल्काची मुदत असणार नाही व मुदतवाढ देण्यात येणार नाही याची सर्व संबधित घटकांनी नोंद घ्यावी.

खाजगी विद्यार्थ्यांना इ. १० वी व इ. १२ वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्वीकारला जाणार नाही, असे कळविण्यात आले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित खुल्या वक्तृत्व स्पर्धेत वेदांत टोंगळे प्रथम

**नांदेड (प्रतिनिधी)**– भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव २०२६, विश्वशांती बुद्ध विहार, वैशाखी पौर्णिमानगर नांदेड आयोजित वक्तृत्व स्पर्धेत खुल्या गटातून वेदांत सचिन टोंगळे याने प्रथम क्रमांक पटकावला असून त्याचे अभिनंदन होत आहे.



महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनचरित्र या विषयावर त्याने बोलक्या देहबोलीने उत्तम शब्दफेक करत अप्रतिम सादरीकरण केले. त्याच्या या वक्तृत्वाने श्रोत्यांबरोबरच परीक्षकांची मने जिंकली. संविधान उद्देशिकेची सुंदर फोटो फ्रेम, सन्मानपत्र व गुलाबपुष्प देऊन वेदांतला सन्मानित करण्यात आले.

# नांदेड परिमंडलात निरंतर वीज योजनेंतर्गत ४२० वितरण रोहित्रांचे काम पूर्ण

### सुरळीत वीज पुरवठ्यासाठी यंत्रणा दुरुस्तीची कामे वेगाने सुरु

**नांदेड (प्रतिनिधी)**– परिमंडलातील ग्राहकांना अधिक सुरळीत आणि अखंडित विद्युत पुरवठ्यासाठी महावितरणतर्फे पावसाळापूर्व दुरुस्ती कामे गतीने करण्यात येत आहेत. यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी निरंतर वीज योजनेंतर्गत परिमंडलास गावठाण भागासाठी ५७० वितरण रोहित्रे प्राप्त झाली असून ४२० वितरण रोहित्रे बसविण्यात आली आहेत. उर्वरित १५० रोहित्रांचे काम प्रगतीपथावर आहे. नरंतर वीज योजनेतील कामांमुळे परिमंडलात ग्राहकांना अधिक चांगली सेवा मिळण्यास मदत होईल.

नांदेड शहर, नांदेड ग्रामीण, भोकर आणि देगलूर विभागांचा समावेश असणाऱ्या नांदेड जिल्ह्यात विद्युत वितरण यंत्रणा मजबुतीसाठी २०० आणि १०० केव्हीएचे ११० वितरण रोहित्र प्राप्त झाले. त्यापैकी ६० रोहित्र बसविण्याचे काम पूर्णत्वास आले असून, उर्वरित ५० रोहित्र बसविण्याचे काम सुरु आहे. हिंगोली जिल्ह्यातही १६० वितरण रोहित्र प्राप्त असून ११० रोहित्र बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित ५० रोहित्र बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

सेलू आणि परभणी विगाभांचा समावेश असणाऱ्या परभणी जिल्ह्यातही ३०० रोहित्र मिळाले. त्यापैकी २५० बसविण्यात आले असून, उर्वरित ५० रोहित्र बसविण्याचे काम सुरु आहे. निरंतर वीज योजनेतील वाढीव रोहित्रांमुळे नागरी वस्त्यावरील विद्युत वितरण व्यवस्था अधिक मजबूत होण्यास मदत होईल.

या शिवाय मान्सूनपूर्व विद्युत दुरुस्ती कामांत परिमंडलातील ३१६ ठिकाणी विद्युत उपकेंद्र दुरुस्ती, ९ ठिकाणी पॉवर ट्रान्सफॉर्मर संरक्षण, १६२ ठिकाणी ३३ केव्ही वाहिन्या दुरुस्तीसह २३९ ठिकाणी तारांवर पडणाऱ्या झाडांच्या फांद्या काढण्याचे काम पूर्णत्वास आलेले आहे. यासह इतर संलग्नीत साधारणत: ६० टक्के कामे पूर्ण करण्यात आली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. या दुरस्ती कामांमुळे ग्राहकांना सुरळीत व अखंडित वीज पुरवठा होईल.

# विज्ञानवादी विचारच प्रगतीकडे नेऊ शकतात -डॉ. अजय गव्हाणे

**नांदेड (प्रतिनिधी)**– महामानवांनी सामाजिक समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव ही त्रिसूत्री समाजात रुजविण्याचे कार्य केले म्हणून आपणही समाजात सामाजिक समता रुजविण्याचे काम केले पाहिजे. विज्ञानवादी विचारच आपल्याला प्रगतीकडे नेऊ शकतात. आपण श्रद्धावान असले पाहिजे; पण अंधश्रद्धेला आपल्या जीवनात धारा देऊ नये, असे प्रतिपादन यशवंत महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख आणि सुप्रसिद्ध वक्ते डॉ. अजय गव्हाणे यांनी केले.

येथील भारतीय स्टेट बँकेचे प्रशासकीय कार्यालय आणि एसबीआय अधिकारी संघटना, एसबीआय सेवा संघटना, एसबीआय कर्मचारी संघटना आणि एसबीआय ओबीसी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ एप्रिल रोजी जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर, कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसूर्य महात्मा फुले आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीचे आयोजन शिवाजीनगरच्या औद्योगिक शाखेत करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एसबीआय प्रशासकीय कार्यालयाचे सहायक महाप्रबंधक मयंक चतुर्वेदी होते. प्रमुख पाहुणे एसबीआय प्रादेशिक कार्यालयाचे मुख्य प्रबंधक अनुप फाटे, (मानव संसाधन) एसबीआय सेवा संघटना नांदेड झोनचे अध्यक्ष सदाशिव चाळणेवाड, एसबीआय सेवा संघटनेच्या डीजीएस शिल्पा जिंतूरकर, अधिकारी संघटना महाराष्ट्र राज्य सर्कलचे उपाध्यक्ष उमेश आडगावकर, अधिकारी संघटना नांदेड मोडुलचे सीआरएस किरणकुमार जिंतूरकर, महाराष्ट्र सर्कलचे डीजीएस कपिल ढवळे, महाराष्ट्र सर्कलचे डेप्युटी जनरल सेक्रेटरी अतुल पखाण, एसबीआय कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष राहुल खेडकर हे होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करीत दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली आणि मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रारंभी शिल्पा जिंतूरकर यांनी कार्यक्रमाची भूमिका विशद करत प्रस्तावना केली. किरणकुमार जिंतूरकर यांनी कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट करीत, महामानवांनी आपल्या जीवनात अनेक संकटांचा सामना करीत सर्वधर्मसमभावाची शिकवण समाजात रुजविण्याचे कार्य केले. त्याचे अनुकरण आपणही केले पाहिजे, असे ते म्हणाले. अध्यक्षीय समारोपात मयंक चतुर्वेदी यांनी महामानवांप्रती आदर व्यक्त करत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

दरम्यान महामानवांच्या संयुक्त जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा तर महिलांसाठी रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.

## महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– योगाचा प्रसार व प्रचार अधिक प्रभावीपणे होण्यासाठी तसेच योग शिक्षक व साधकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी राज्यात स्वतंत्र योग आयोग स्थापन करण्याच्या मागणीसाठी नांदेडचे अप्पर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड यांना निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनावर महाराष्ट्र योग शिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार, कार्यकारी अध्यक्ष डॉ. कृणाल महाजन, जिल्हाध्यक्ष अर्जुन शिंदे यांच्या स्वाक्षरी आहेत. निवेदन सादर करण्यासाठी राज्य कार्यकारिणीचे विशेष आमंत्रित सदस्य डॉ. सायन्ना मठमवार, किशन भवर तसेच संघाचे सदस्य सोपानराव काळे, राघव दंडे व बाबाराव इबीदवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

# तंत्रमंत्र


विज्ञानयुगातील बितंबातम्या

# आधार वापरून बनवा विवाह प्रमाणपत्र!

ऑनलाइन प्रक्रिया समजून घ्या...

**लग्नानंतर विवाह प्रमाणपत्र मिळवणे हे अनेक लोकांसाठी डोकेदुखी ठरते. वकिलांची मोठी फी भरण्याच्या किंवा सरकारी कार्यालयांमध्ये धावपळ करण्याच्या भीतीमुळे लोक अनेकदा हे काम पुढे ढकलतात. विवाह प्रमाणपत्र एक आवश्यक दस्तऐवज असून, त्यामुळे अनेक सरकारी कामांमध्ये अडथळा येऊ शकतो. आजच्या डिजिटल युगात तुम्ही फक्त तुमच्या आधार कार्डचा वापर करून घरबसल्या तुमचे विवाह प्रमाणपत्र सहज मिळवू शकता.**

ऑनलाइन लांबलचक अर्ज भरण्याच्या भीतीमुळे अनेक लोक हे महत्त्वाचे काम पुढे ढकलतात. अशा परिस्थितीत, आधार कार्ड खूप उपयुक्त ठरते. बहुतेक राज्ये आता त्यांच्या ऑनलाइन पोर्टलवर आधार वापरून तपशील भरण्याचा पर्याय देतात. अशा प्रकारे तुम्हाला फक्त निवडक तपशील प्रविष्ट करायचा आहे आणि विवाह प्रमाणपत्र घरबसल्या सहजपणे तयार केले जाऊ शकते.



## अर्ज करण्यापूर्वी ही कागदपत्रे तयार ठेवा...


ऑनलाइन विवाह प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्यापूर्वी काही विशिष्ट कागदपत्रे तयार ठेवणे महत्त्वाचे आहे. यात पती आणि पत्नी दोघांचेही आधार कार्ड, दोघांचीही दहावीची गुणपत्रिका किंवा जन्म प्रमाणपत्र, लग्नाचे निमंत्रण पत्रिका किंवा मंदिर, गुरुद्वारा किंवा चर्चमधील विवाह प्रमाणपत्र, पती आणि पत्नीचा एकत्रित फोटो, आधार कार्ड आणि दोन साक्षीदारांचे फोटो.

## लक्षात ठेवण्यासारखे मुद्दे...

अनेक राज्यांमध्ये, विवाह प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज केल्यानंतर तुम्हाला पडताळणीसाठी उपविभागीय दंडाधिकारी ( SDM ) किंवा निबंधकांच्या कार्यालयात जावे लागते. अशा परिस्थितीत तुम्हाला पडताळणीसाठी सोयीस्कर तारीख आणि वेळ निश्चित करावी लागेल. तुमच्या भेटीच्या दिवशी सर्व कागदपत्रे आणि साक्षीदारांसह वेळेवर SDM किंवा निबंधकांच्या कार्यालयात पोहोचा. पडताळणीनंतर तुमचे डिजिटल विवाह प्रमाणपत्र तयार होईल आणि तुम्ही पोर्टलवर लॉग इन करून ते सहजपणे डाउनलोड करू शकता.

## विवाह प्रमाणपत्रासाठी अर्ज कसा करावा?

विवाह प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करण्यासाठी https://igrmaharashtra.gov.in/ किंवा https://aaplesarkar.mahaonline.gov.in/ या वेबसाइटला भेट द्या. जर तुम्ही नवीन वापरकर्ता असाल, तर नवीन वापरकर्ता नोंदणीवर क्लिक करून खाते तयार करा आणि लॉग इन करा. लॉग इन केल्यानंतर, 'सेवा' अंतर्गत 'विवाह नोंदणी' निवडा आणि 'नवीन अर्ज' वर क्लिक करा. त्यानंतर, सर्व माहिती अचूक असल्याची खात्री करून अर्ज भरायला सुरुवात करा. येथे, तुम्हाला तुमच्या आधार कार्डचा तपशील पाहता येईल. 'होय' निवडा आणि तुमचा आधार क्रमांक प्रविष्ट करा आणि ओटीपीने त्याची पडताळणी करा. असे केल्याने तुमचा बराचसा तपशील जतन होईल. त्यानंतर, सर्व आवश्यक कागदपत्रे अपलोड करा. कागदपत्रे सुस्पष्ट असल्याची खात्री करा. त्यानंतर, शुल्क भरा आणि पावती डाउनलोड करा. प्रक्रिया पूर्ण झाल्यावर तुम्हाला मिळालेला अर्ज क्रमांक जपून ठेवा. यामुळे तुम्हाला तुमच्या विवाह प्रमाणपत्राची स्थिती सहजपणे तपासता येईल.




# वाकलेल्या पात्यामुळे कोसळू शकतो चालू पंखा!



## घासून स्वच्छ करणे मोठाच धोका!

**घरात प्रवेश केल्यावर लोकांचे लक्ष अनेकदा सीलिंग फॅनकडे जाते. जर पंख्यावर धूळ साचलेली असेल तर ते लाजिरवाणे वाटते. पंख्याच्या उत्तम कामगिरीसाठी तो स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे लोक वेळोवेळी त्यांचे सीलिंग फॅन स्वच्छ करतात. पण साफसफाई करताना पंख्याची पाती किंचित वाकल्याने त्याच्या कार्यक्षमतेवर आणि हवेच्या प्रवाहावर लक्षणीय परिणाम होऊ शकतो. छतावरील पंख्यांची रचना करताना सर्व पात्यांचे वजन आणि कोन समान असतात. एक जरी पाते वाकले तर पंख्याचा समतोल बिघडतो, ज्यामुळे तो जास्त हलतो. शिवाय, खोलीभर हवेचा प्रवाह योग्यरित्या वितरित होऊ शकत नाही.**

## पंखा कसा काम करतो?

क्रॉम्प्टनच्या ब्लॉग पोस्टनुसार, छतावरील पंखा एका अगदी सोप्या यंत्रणेवर चालतो. पंखा फिरतो आणि खोलीत हवा फेकतो. तुम्ही पंखा चालू करताच त्याची पाती गोलाकार गतीने फिरू लागतात. ती फिरत असताना पाती त्यांच्या खाली कमी दाबाचे क्षेत्र तयार करतात. ते खोलीतील हवा वरच्या दिशेने पात्यांकडे खेचते. त्यानंतर पाती ती हवा खोलीच्या प्रत्येक कोपऱ्यात ढकलतात.

## ब्लेड्स होतात खराब

लोक अनेकदा कापडाने पंखा साफ करतात. ज्यामुळे ब्लेड्स अगदी थोड्याशा दाबानेही वाकू शकतात. यामुळेच साफसफाई करताना ब्लेड्स अनेकदा वाकतात, ज्यामुळे त्यांचे संतुलन आणि कोन बिघडतो. खराब झालेले किंवा वाकलेले ब्लेड्स पंख्याचे संतुलन बिघडवतात, ज्यामुळे तो डगमगतो. खराब ब्लेड्समुळे ब्लेडचे संतुलन आणि कोन बिघडतो, ज्यामुळे हवेच्या प्रवाहात समस्या निर्माण होतात.

## कसे दुरुस्त करता येईल?

साफसफाई करताना ब्लेड्स थोडे वाकल्यास, तुम्ही त्यांना थोडे वाकवून त्यांच्या मूळ आकारात परत आणण्याचा प्रयत्न करू शकता, परंतु ते बदलून घेणे अधिक चांगले राहील.

# यूएसबी किलर म्हणजे काय?

## फोन किंवा लॅपटॉपला जोडले, तर डिव्हाइस पडेल कायमचे बंद

**जर तुम्हाला कधी कुठे एखादा पेन ड्राइव्ह सापडला, तर तो तुमच्या फोन किंवा लॅपटॉपला जोडण्याची चूक करू नका. तुम्ही ते जोडल्याबरोबरच तुमचे डिव्हाइस कायमचे बंद पडण्याची शक्यता आहे. खरे तर, एक यूएसबी किलर नेमके हेच करू शकते. नावाप्रमाणेच, साध्या पेन ड्राइव्हसारखे दिसणारे हे उपकरण, डिव्हाइसेसना निकामी करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, यूएसबी किलर ज्या कोणत्याही डिव्हाइसला जोडला जातो, त्याला उच्च व्होल्टेज पाठवतो, ज्यामुळे ते काही सेकंदात कायमचे निकामी होते. यूएसबी किलर ज्या डिव्हाइसला जोडला जातो, त्याच्या मदरबोर्डवरील मुख्य आयसी (IC) जाळण्यासाठी डिझाइन केलेले आहे. यानंतर, डिव्हाइस दुरुस्त करणे जवळजवळ अशक्य होते.**

## यूएसबी किलर धोकादायका?

यूएसबी किलर हे एक धोकादायक उपकरण आहे कारण त्याचा धोका त्याच्या दिसण्यावरून ओळखता येत नाही. एका साध्या पेन ड्राईव्हच्या आकाराचे असूनही, त्यात फोन किंवा लॅपटॉपसारखे उपकरण पूर्णपणे निकामी करण्याची शक्ती असते. इतकेच नाही, तर ते आपले काम काही सेकंदातच पूर्ण करते. ड्राईव्ह उपकरणाला जोडल्याबरोबरच, ते उपकरणामध्ये उच्च-व्होल्टेजचा प्रवाह पाठवते, ज्यामुळे कोणालाही काही कळायच्या आतच ते उपकरण निकामी होते. इतकेच नाही, तर यूएसबी किलर ज्या उपकरणाला जोडलेले असते, त्याच्या मदरबोर्डवरील मुख्य आयसीला (IC) लक्ष्य करते, ज्यामुळे उपकरण पुन्हा कार्यान्वित करणे जवळजवळ अशक्य होते.

## यूएसबी किलर काय?

नावाप्रमाणेच, हे पेन ड्राइव्हसारखे उपकरण फोन, लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरसारखे कोणतेही डिव्हाइस त्वरित निकामी करू शकते. लोक याला सामान्य यूएसबी ड्राइव्ह समजण्याची चूक करू शकतात. तथापि, हे डेटा साठवण्यासाठी नाही, तर डिव्हाइसेसना निकामी करण्यासाठी डिझाइन केलेले आहे.

# अजब-गजब

## जगातील सर्वांत जास्त वजनी पनीर

**लंडन :** लग्नात पनीरपासून बनलेल्या पदार्थांचा आपण यथेच्छ फडशा पाडतो. पण आता हा पनीर आपल्या जिभेपुरताच मर्यादित राहिला नाही तर वर्ल्ड रेकॉर्डही बनवू लागला आहे. रोमच्या इयोनिस स्टेथोरिस या व्यक्तीने जगातील सर्वांत जास्त वजनाचा पनीर बनवून गिनीज बुकात नाव नोंदवले आहे. बकरीच्या दुधापासून बनवलेल्या या पनीरचे वजन ९३९ किलो भरले. लहानपणापासूनच काही तरी वेगळे करून दाखविण्याची जिद्द असलेल्या इयोनिसने हा पनीर बनविण्यासाठी १५ लोकांची मदत घेतली. या पनीरची विशेषता अशी आहे की तो पूर्णपणे हातांनी बनवले आहे. त्यासाठी कोणत्याही मशिनची मदत घेण्यात आलेली नाही. पनीर बनून जेव्हा तयार झाले तेव्हा हजारो लोकांनी त्याचा आस्वाद घेतला. दीर्घकाळाच्या मेहनतीनंतर यश प्राप्त केलेच, अशी प्रतिक्रिया इयोनिसने पत्रकारांशी बोलताना दिली.

## घोड्यासारखी धावते गाय!

**बर्लिन : मनात इच्छाशक्ती असेल काहीच अशक्य नाही, याचीच जाणीव जर्मनीच्या एका किशोरवयीन मुलीने पुन्हा एकदा सर्वांना करून दिली असून, तिने आपल्या गायीला चक्क घोड्यासारखे पळवणे सुरू केले आहे. लहानपणापासून घोडेसवारीची हौस असलेल्या या अट्टाहासी कन्येला तिच्या पालकांनी घोडा घेऊन देण्यास नकार दिला तेव्हा तिने गायीलाच घोडा बनवण्याचा कारनामा करून दाखवला. तिच्या या कारनाम्यामुळे सर्वांचीच बोटे तोंडात गेली आहेत.**



रेगिना मेयर नावाच्या या १५ वर्षीय तरुणीने दररोज मेहनत घेऊन गायीला घोडीसारखे बनवले आहे. आता ही गाय घोड्यासारखे धावते, उड्या मारते. ल्यूना असे या गायीचे नाव असून, तिचा जन्म रेगिनाच्याच शेतात दोन वर्षांपूव झाला होता.

रेगिनाने पहिल्यापासून ल्यूनासोबत मैत्री केली होती. त्यामुळे ल्यूनाने रेगिनाला सहकार्य करण्याचाच निर्णय घेतला असावा, असे भासते. दक्षिण जर्मनीच्या लॉफेन भागात राहणाऱ्या रेगिनाने सांगितले, की मला घोडेसवारीची प्रचंड हौस आहे. त्यामुळेच मी वडिलांना घोडा विकत घेऊन देण्याची विनंती केली होती. पण त्यांनी नकार दिला. त्यामुळे मी आमच्याकडे असलेल्या गायीला घोडा बनवण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय पूर्णत्वास नेण्यासाठी मात्र मला प्रचंड मेहनत करावी लागली. गायीसारख्या प्राण्याला जास्त पळवता येत नाही आणि उड्याही मारायला लावता येत नाही. पण ल्यूनाने कमाल केली. तिने पहिल्यापासून मला सहकार्य केले आणि माझे स्वप्न सत्यात उतरले आहे. ल्यूना आता गाय राहिलेली नाही तर घोडी झाली आहे. एखाद्या घोडीत असणारे सर्व गुण ल्यूना शिकून गेली आहे, असे रेगिना म्हणाली.



## रंगबदलू तलाव...

**न्यूयॉर्क :** पश्चिम अमेरिकेच्या व्योमिंग राज्यातील एक तलाव गेल्या काही दशकांपासून पर्यटकांसाठी आश्चर्याचे कारण ठरत असून, या तलावातील पाण्याचा रंग हवामानानुसार बदलत असल्याने सर्वच जण हैराण आहेत. शास्त्रज्ञांनी या बदलाला पाण्यातील रासायनिक प्रक्रिया जबाबदार असल्याचे म्हटले आहे. येलोस्टोन नॅशनल पार्कमध्ये हा मॉर्निंग ग्लोरी नावाचा तलाव आहे. शास्त्रज्ञांनी सांगितले, की अनेक दशकांपासून पर्यटक आपल्या इच्छापूतसाठी तलावात शिक्के फेकत आले आहेत. या शिक्क्यांच्या केमिकल रिॲक्शनमुळे वेगवेगळ्या प्रकारचे बॅक्टेरिया विकसित झाले आहेत. या बॅक्टेरियांमुळेच तलावाचा रंग हवामानानुसार बदलत असतो. सध्या एल्गी फोंटोसिंथेटिक आणि थर्मोफिलिक बॅक्टेरिया तलावात निर्माण झाले आहेत. त्यामुळे तलावातील पाण्याला हिरवा- पिवळा रंग प्राप्त झाला आहे. पिवळ्या रंगाला जबाबदार बॅक्टेरिया तलावाच्या किनाऱ्यावर जमले आहेत. त्यामुळे तलावाभोवती पिवळे वलय तयार झाले आहे. या अनोख्या संयोगामुळे तलावाला मात्र रंगबदलू तलाव संबोधले जात आहे. पर्यटक हा चमत्कार मानून गद करत आहेत.

## घर उडाले आकाशी...

**कॅलिफोर्निया :** आपण घरात आहोत आणि अचानक घर आकाशात उडू लागले तर काय होईल... कल्पनाही करवत नाही ना... मुळात असं कधीच घडू शकत नाही, असं आपण म्हणाल. कारण भलमोठं घर उडणं शक्य थोडंच आहे. एखाद्या वेळी मोठे वादळ आले तर छत उडून जाण्याचे प्रकार घडू शकतात. पण थेट घर उडणं अशक्यच... हे अशक्य काम शक्य करून दाखवले ते ७८ वर्षीय काटरून कार्ल फ्रेडरिकसन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी. या सर्वांनी मिळून ३०० हिलियम बलून्सच्या मदतीने घराला दहा फूट उंचीपर्यंत उडवले. हे दृश्य पाहणाऱ्यांच्या डोळ्यांची पारणे फिटली. भूतो न भविष्यंती घडणारा हा प्रकार बघणे सर्वांनाच रोमांचित करणारे होते. कॅलिफोर्नियाच्या वाळवंटी प्रदेशात हा प्रयोग करण्यात आला. एखाद्या कार्टून चित्रपटात असते तसेच हे दृश्य होते. नॅशनल जियोग्राफिक चॅनेलच्या हाऊ हार्ड कॅन इट बी या कार्यक्रमाअंतर्गत हा प्रयोग करण्यात आला. प्रयोगादरम्यान काही अभियंते, वैज्ञानिक, दोन



बलून पायलट आणि डझनभर कर्मचारी हजर होते. प्रत्येक बलून आठ फूट उंचीचा होता आणि त्यात एक टँक हिलियम वायू भरलेला होता. साधारण चार खोल्यांचे हे एक घर सर्व बलूनला बांधण्यात आले. त्यानंतर घराला बलूनसोबत उडवण्यात आले. घरात बसून काटरून यांनी उडण्याचा आनंद घेतला. कार्यक्रमाचे कार्यकारी निर्माता ब्रेन ब्रॉवी यांनी सांगितले, की सामान्य घर उडवणे तसे अवघड आहे. पण तरीही आम्ही ही कल्पना वास्तवात उतरवली. यासाठी बनविलेले खास प्रकारचे घर वजनाने हलक्या बांधकाम साहित्याने बांधण्यात आलेले होते.

## हजारो शिक्क्यांचा बनला एक शिक्का!

**ग्रेंड रेपिड्स (मिशिगन) : ८४ हजार शिक्के जमा करून या शिक्क्यांचा एक शिक्का बनविण्याचा अनोखा प्रयोग मिशिगनच्या ग्रेंड रेपिड्स शहरातील रहिवासी वांडर मार्टिच नावाच्या महिलेने केला असून, ही असामान्य कलाकारी करण्यासाठी ती २००६ सालापासून शिक्के जमा करत होती.**



मार्टिच सांगते, की २००६ साली माझा घटस्फोट झाला होता. त्या वेळी मी दोन मुलींची बेरोजगार माता होते. एक सहा वर्षांची आणि एक नऊ वर्षांची अशा दोन मुलींच्या पालनपोषणाची जबाबदारी माझ्यावर पडली. त्या वेळी मिळेल ते काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवू लागले. हे करत असतानाच प्लास्टिकच्या एका मगमध्ये मुलींच्या भवितव्यासाठी पै-पै जमा करून ठेवायचे. (मिशिगनमध्ये पैनी नावाचे स्थानिक चलन आहे.) काही महिन्यांतच मला चांगली नोकरी लागली. मग दर महिन्याला २०डॉलर पैनी मी बचत करू लागले. २०१० मध्ये ग्रॅन्ड रेपिड आर्ट प्राइज कॉम्पिटिशनमध्ये माझ्याकडील खजिन्याचा वापर करण्याचा विचार माझ्या डोक्यात आला. सर्व शिक्के जमा करून त्यातून एक शिक्का तयार केला तर माझा विक्रम घडेल, असे मला वाटले. मोठ्या लाकडी फ्रेममध्ये एक महाकाय शिक्का मग मी साकारला. स्थानिक बँकेनेही मला याकामी मोठे सहकार्य केले, असे मार्टिचने सांगितले. नियतीने बिकट परिस्थिती आणूनही त्यावर मात करत मार्टिचने ज्या पद्धतीने आयुष्यात काहीतरी नवीन करून दाखवले, याबद्दल सर्वांनाच कौतुक वाटत आहे.



# गोरेगाव नेस्को ड्रग्ज प्रकरणाचे धागेदोरे बॉलिवूडपर्यंत; अभिनेत्री जिया जेकबला अटक



**मुंबई (प्रतिनिधी)** – मुंबईतील गोरेगाव येथील NESCO Exhibition Centre इथे उघडकीस आलेलं ड्रग्ज प्रकरणाचा तपास जसजसा पुढे जातोय, तसतशी अत्यंत खळबळजनक माहिती समोर येत आहे. नेस्को सेंटर इथल्या कॉन्सर्टमध्ये ड्रग्ज ओवरडोसमुळे दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झालेला. आता या प्रकरणात एका अभिनेत्रीलाही पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी मीरा रोड येथील ३३ वर्षांची अभिनेत्री जिया जेकब हिला अटक केली आहे. म्युझिक कॉन्सर्टशी संबंधित अंमली पदार्थांच्या एका कथित रॅकेटशी जोडलेले आर्थिक व्यवहार वळवण्यासाठी या अभिनेत्रीच्या बँक अकाउंट्सचा वापर करण्यात आला होता, असं तपासादरम्यान निष्पन्न झालंय.

पोलिसांच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेली अभिनेत्री जिया जेकब आणि या प्रकरणात अटक करण्यात आलेले इतर आरोपी यांच्यात झालेल्या आर्थिक व्यवहारांतून पैशांच्या देवाणघेवाणीची एक स्पष्ट साखळी समोर आली आहे. विशेष म्हणजे, आरोपी आयुष साहित्य याच्यासोबतची चॅट हिस्ट्री देखील पोलिसांच्या हाती लागली आहे.

आरोपींनी जिया जेकबच्या अकाउंट्सवरुन व्यवहार केलेल्या रकमांचा तपशीलही समोर आले आहेत. आनंद पटेल यानं ६४,०००, विनीत गेरलानी यानं २२,५००, शुभा अग्रवाल हिनं १,६६,४०० आणि आयुष साहित्य यानं १,८४,६०० इतकी रक्कम जमा केली होती. पोलिसांनी असा दावा केलाय की, हे सर्व ऑनलाइन व्यवहार संगीत कार्यक्रमादरम्यान अंमली पदार्थांच्या खरेदी-विक्रीशी संबंधित होते. पोलीस तपासात समोर आलेल्या घटनांनुसार, जिया जेकब त्या म्युझिक कॉन्सर्टमध्ये उपस्थित होती, जिथे ओव्हरडोसची घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ती गेल्या दोन वर्षांपासून मुख्य फरार ड्रग्ज सप्लायरसोबत लिव्ह-इन-रिलेशनशिपमध्ये होती. असं सांगितलं जातंय की, ज्या फरार आरोपीच्या पोलीस शोधात आहेत, तो आरोपी परदेशात पळून गेलाय.

मीडिया रिपोर्टनुसार, अभिनेत्री जिया जेकब हिच्या बँक अकाउंट्समध्ये लाखो रुपयांचे मोठे ट्रान्झॅक्शन्स करण्यात आलेत. तसेच, अभिनेत्रीचा वैयक्तिक खर्च फरार सप्लायर उचलायचा. पोलिसांनी अशीही माहिती दिलीय की, अभिनेत्री जिया जेकब हिला आरोपीच्या बिजनेस ऑपरेशन्सबाबत कोणतीही स्पष्ट माहिती मिळालेली नव्हती. अटक करण्यात आलेला आरोपी आयुष साहित्य यानं पोलिसांना दिलेल्या जबाबाच्या आधारे, पोलिसांनी मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ जप्त केले आहेत. पोलिसांनी ९३३ गोळ्या (वजन अंदाजे ४३५ ग्रॅम आहे) जप्त केल्या असून, त्यांची बाजारपेठेतील अंदाजित किंमत १५.४९ लाख रुपये इतकी आहे. मुंबईहून गोव्याच्या दिशेनं पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना, साहित्य यानं हे अंमली पदार्थ पोलादपूरजवळ फेकून दिले होते. चेक पॉईंटवर करण्यात आलेल्या सुरुवातीच्या तपासणीत पोलिसांना काहीही आढळलं नसलं तरी, अटकेच्या भीतीपोटी आपण हे अंमली पदार्थ फेकून दिल्याची कबुली साहित्य यानं नंतर दिली. आरोपी आयुष साहित्यनं दिलेल्या जबाबाच्या आधारे, बुधवारी हे अंमली पदार्थ हस्तगत करण्यात आले. आयुष साहित्य तपासात पूर्णपणे सहकार्य करत नसल्याचं पोलिसांनी नमूद केलं असून, या अंमली पदार्थांचा मूळ स्रोत शोधण्यासाठी सध्या तपास सुरू आहे.

# वाराणसीतून सुरु होणार २ अमृत भारत ट्रेन, युपी-महाराष्ट्राची कनेक्टिव्हीटी होणार सुपरफास्ट

**वाराणसी (वृत्तसंस्था)** – रेल्वे प्रवाशांच्या दृष्टीने आनंदाची बातमी आहे. येत्या २८ एप्रिलपासून वाराणसीतून दोन नवीन अमृत भारत ट्रेनची सुरुवात होणार आहे. ज्यामुळे उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्राच्या दरम्यानचा प्रवास अधिक जलद आणि सोपा आणि स्वस्त होणार आहे. या दोन ट्रेन सुरु झाल्यानंतर लांबचा प्रवास करणारे प्रवासी आणि धार्मिक पर्यटन करणाऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी २८ एप्रिल रोजी या दोन नवीन अमृत भारत ट्रेना हिरव्या झेंडा दाखवून रवाना करणार आहेत.

यातील पहिली ट्रेन वाराणसी (बनारस) ते हडपसर (पुणे) दरम्यान चालविली जाणार असून या ट्रेनचा क्रमांक २२५८९/२२५९० असा आहे. ही ट्रेन प्रयागराज, झाँसी, इटारसी आणि भुसावळ सारख्या प्रमुख स्थानकांवर थांबा घेणार आहे. या मार्गाचा प्रवासाचा वेळ सुमारे २८ ते ३० तास असा असणार आहे. दुसरी ट्रेन अयोध्या ते मुंबई दरण्यान चालविली जाणार आहे. ही ट्रेन उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रातून मुंबईत पोहचणार आहे.या ट्रेनमुळे उत्तर भारत आणि आर्थिक राजधानी मुंबईची कनेक्टिव्ही आणखी मजबूत होणार आहे..

अमृत भारत ट्रेन आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असणार आहेत. यात पुश-पुल तंत्राचा वापर केला जाणार आहे, ज्यामुळे ट्रेनचा वेग आणि परऑर्मेन्स चांगला असेल . या ट्रेनमध्ये नॉन-एसी कोच असणार आहे. ज्यात बहुतांशी स्लीपर आणि जनरल डब्यांचा समावेश केला आहे. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना स्वस्तात प्रवास करण्याचा पर्याय मिळणार आहे. याशिवाय आरामदायक सीटींग आणि इतर आवश्यक सुविधा देखील मिळणार आहेत.

या ट्रेनचा फायदा खासकरुन धार्मिक पर्यटन करणाऱ्या प्रवाशांना आणि लांबपल्लूयाच्या प्रवाशांना होणार आहे. अयोध्या आणि वाराणसी सारख्या शहरांना मुंबई सारख्या शहराला जोडल्याने धार्मिक आणि व्यावसायिक दोन्ही प्रवास सोपे होणार आहेत.

नवीन ट्रेन सुरु झाल्याने प्रवाशांना थेट कनेक्टिव्हीटी मिळेल, ज्यामुळे वारंवार ट्रेन बदलण्याची गरज राहणार नाही. यामुळे न केवळ वेळेची बचत होईल. शिवाय प्रवास खूप स्वस्तात होईल. सरकारचे हे पाऊल देशाच्या रेल्वे नेटवर्कला मजबूत करण्याच्या दिशेने एक मोठा प्रयत्न मानला जात आहे. युपी आणि महाराष्ट्र सारख्या मोठ्या राज्यात चांगल्या कनेक्टिव्हीटीमुळे व्यापार, पर्यटन आणि सर्वसामान्य लोकांना प्रवास करणे सोपे होणार आहे.

# आरबीआयकडून 'पेटीएम'चा बँकिंग परवाना कायमचा रद्द




**मुंबई (प्रतिनिधी)** – भारतीय रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी पेटीएम पेमेंट्स बँकेवर कठोर कारवाई करत त्यांचा बँकिंग परवाना तात्काळ प्रभावाने रद्द केला आहे. बँकिंग नियमन कायदा, १९४९ अंतर्गत हा परवाना रद्द करण्यात आला असून, आता ही बँक भारतात बँकिंग व्यवहार करण्यास पात्र राहणार नाही.

आरबीआयने आपल्या आदेशात या कारवाईमागील स्पष्ट कारणे नमूद केली आहेत. बँकेचे कामकाज आणि व्यवस्थापन हे ठेवीदारांच्या हितासाठी नुकसानकारक असल्याचे आरबीआयला आढळून आले. पेमेंट बँक परवान्यासाठी आवश्यक असलेल्या अटींचे पालन करण्यात बँक वारंवार अपयशी ठरली. यापूर्वी झालेल्या तपासात एकाच पॅन कार्डवर हजारो खाती उघडणे आणि केवायसी प्रक्रियेतील गंभीर त्रुटी समोर आल्या होत्या. ज्या ग्राहकांच्या खात्यात किंवा वॉलेटमध्ये आधीच रक्कम शिल्लक आहे, त्यांना ती काढण्यावर किंवा वापरण्यावर कोणतेही निर्बंध नाहीत. आता ग्राहकांना त्यांच्या पेटीएम बँक खात्यात, वॉलेटमध्ये किंवा फास्टॅगमध्ये नवीन पैसे जमा करता येणार नाहीत.

ऑगस्ट २०१५ मध्ये विजय शेखर शर्मा यांच्या मालकीच्या 'वन ९७ कम्युनिकेशन्स'च्या पाठबळावर पेटीएमला बँकिंग परवाना मिळाला होता. या परवान्यानुझरींसार त्यांना ठेवी स्वीकारण्याची परवानगी होती, मात्र थेट कर्ज देण्याचे अधिकार नव्हते. मार्च २०२२ मध्ये ग्राहकांच्या पडताळणीत त्रुटी आढळल्याने आरबीआयने ११ मार्च २०२२ पासून नवीन ग्राहक जोडण्यावर बंदी घातली होती. जानेवारी २०२४ मध्ये नियमांचे उल्लंघन, निधीचा वापर आणि तांत्रिक पायाभूत सुविधांमधील त्रुटींमुळे आरबीआयने बँकेला नवीन ठेवी स्वीकारणे बंद करण्याचे आदेश दिले होते. वारंवार दिलेल्या सूचनांनंतरही सुधारणा न झाल्यामुळे शेवटी आरबीआयने बँकिंग परवानाच रद्द करण्याचा टोकाचा निर्णय घेतला.

# घसरगुंडी अंगावर पडून चिमुकलीचा मृत्यू

**पुणे (प्रतिनिधी)** – बागेतली घसरगुंडी नेहमीच मुलांची आवडती असते, पण याच घसरगुंडीचा खेळ जीवावर बेतला. बागेत घसरगुंडीवर खेळणाऱ्या ४ वर्षीय मुलीचा घसरगुंडी कोसळून दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

पुण्यात हडपसरमधील मगरपट्टा परिसरात ही घटना घडली आहे. सोसायटीच्या आवारात लोखंडी घरसरगुंडी अंगावर कोसळून साडेचार वर्षीय मुलीचा मृत्यू झाला. अनिका नवनाथ देवीकर असं मृत मुलीचे नाव आहे. अनिका सोसायटीच्या आवरत खेळत होती. सोसायटीत मुलांसाठी बसविण्यात आलेल्या लोखंडी घसरगुंडीचा आधार व्यवस्थित नसल्याने ती अचानक कोसळली.

या अपघातात अनिकाच्या डोक्याला, चेहऱ्याला, आणि मानेला गंभीर दुखापत झाल्यामुळे ती जागेवरच बेशुद्ध पडली, तातडीने तिला खासगी रुग्णालयात हलवण्यात आले, परंतु १८ दिवस मृत्यूशी झुंज देणाऱ्या या चिमुकलीची आज प्राणज्योत मालवली. घसरगुंडीबाबत अनेक तक्रारी देऊनही चेअरमनने याकडे दुर्लक्ष केले, घसरगुंडी काढून टाकण्याबाबत अनेक तक्रारी केल्या परंतु योग्य ती कारवाई करण्यात आली नाही, चेअरमनच्या या निष्काळजीपणामुळेच आज अनिका हे जग सोडून गेली आहे. या घटनेमुळे पुण्यात खळबळ उडाली आहे.

# रिक्षा चालकांसाठी मराठी सक्तीवरून मुंबईत ठिणगी

**मुंबई (प्रतिनिधी)** – शहरातील रिक्षावाल्यांना मराठीची सक्ती करण्याचा निर्णय राज्याच्या परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. सरनाईक यांच्या या निर्णयाचे शिवसेना, मनसे पक्षाकडून स्वागत होत असून शिवसेना नेते माजी खासदार संजय निरुपम यांनी या सक्तीला आपला विरोध केला आहे. त्याच पार्श्वभूमीवर शुक्रवारी संजय निरुपम हे दहिसरमधील रिक्षा चालकांसोबत संवाद साधण्यासाठी आले होते. त्याचवेळी, मनसैनिकांनी संजय निरूपम यांच्या यांच्याविरोधात घोषणाबाजी केली. विशेष म्हणजे, मनसेच्या कार्यकर्त्यांनी मराठीची घोषणा देत संजय निरुपम यांच्या कारची हवा सोडली, त्यांच्या गाडीवर बाटली फेकून मारल्याने चांगलाच गोंधळ उडाला. टॅक्सी रिक्षा चालकांसाठी मराठी सक्तीवरून मुंबईत दहिसरमध्ये पहिली ठिणगी पडली आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला.

राज्य सरकारने रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी १ मे पासून मराठी भाषा सक्तीची केली असून त्याची परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. संजय निरुपम यांनी मराठी न येणाऱ्या चालकांचे परवाने रद्द करण्याच्या निर्णयावर तीव्र आक्षेप नोंदवला आहे. रिक्षाचालकांपैकी ७० टक्के लोक परप्रांतीय असल्याचे सांगत या निर्णयावर पुनर्विचार करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. या सक्तीला विरोध दर्शवत रिक्षाचालकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केल्याने मनसे कार्यकर्ते आक्रमक झाले. मनसेने मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांसह दहीसर येथील गणपत पाटील नगर रिक्षा स्टॉप गाठत संजय निरुपम यांच्याविरोधात घोषणाबाजी सुरू केली. एकीकडून शिंदे शिवसेना पदाधिकारी तर दुसरीकडून मनसे पदाधिकारी असा साधारणपणे अर्धा ते पाऊण तास गोंधळ पाहायला मिळाला. जोपर्यंत संजय निरुपम जात नाही तोपर्यंत आंदोलन आम्ही करत राहणार असा पवित्रा मनसैनिकांनी घेतला. सगळ्यांसोबत संवाद साधून संजय निरुपम त्या ठिकाणाहून निघत असताना मनसैनिक आक्रमक झाले, त्यांनी निरुपम यांच्या गाडीवर बाटल्या, दगड फेकण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पोलिसांनी गोंधळ करणाऱ्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आणि वातावरण शांत केले. मात्र, या घटनेने शिवसेना आणि मनसैनिकांमध्ये काही काळ तणावाचे वातावरण पाहायला मिळाले. पोलिसांनी तात्काळ घटनेचे गांभीर्य लक्षात घेत मनसे कार्यकर्त्यांची धरपकड सुरू केली.

दरम्यान, दुसरीकडे ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनीही रिक्षा चालकांच्या मराठी सक्तीला विरोध करत थेट मनसेचे युवा नेते अमित ठाकरे यांनाच लक्ष्य केले. रिक्षा आणि टॅक्सीचालकांच्या संपावेळी मराठी रिक्षाचालकांना कोणी अडवले तर आम्ही त्यांना मनसे स्टाईलने धडा शिकवू, असा इशारा अमित ठाकरे यांनी दिला.

## टी.सी. हरवली

माझी कौसर बेगम मिर्झा मोहम्मद बेग या नावाची सहावी पासची टी.सी. अरब गल्ली किल्ला रोड ते रेल्वे स्टेशन प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क मोबाईल**
**मो. ८८८८१९२४३९**

### नगर परिषद भोकर जि.नांदेड

**जाहीर प्रगटन**

श्री/श्रीमती/सौ.स्वप्निल पंडितराव टारपे गट क्र.४२७ मधील प्लॉट क्र.११ जुना वार्ड क्र.०५ जुना मालमत्ता क्र.H-९५०/९४ नवीन वार्ड क्र.१० नवीन मालमत्ता क्र.२८४५/१० वर बांधकाम परवानगी मिळण्याकरिता नगरपरिषद नोंदणीकृत आर्कीटेक्ट/इंजिनिअर यांचेद्वारे ऑनलाइन अर्ज सादर केला आहे.

जागेची रुंदी उत्तर-दक्षिण :-१५ मी
जागेची रुंदी पूर्व-पश्चिम :-१२ मी.
जागेची चतु:सिमा उत्तर :-०९ मी.रस्ता
जागेची चतु:सिमा दक्षिण :-प्लॉट क्र. १२
जागेची चतु:सिमा पूर्वेस :-प्लॉट क्र.२०
जागेची चतु:सिमा पश्चिमेस :-रस्ता.

वरील चतु:सीमेतील जागेवर बांधकाम परवानगी देणेबाबत कोणाची काही हरकत असल्यास संबंधितानी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाचे आत मुख्याधिकारी, नगरपरिषद भोकर यांचेकडे दाखल करावी.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणताही उजर ऐकून घेतला जाणार नाही

मुख्याधिकारी
नगरपरिषद भोकर,जि.नांदेड

### नगर परिषद भोकर जि.नांदेड

**जाहीर प्रगटन**

श्री/श्रीमती/सौ.गोविंद केशव पांचाल गट क्र.२८ मधील प्लॉट ज्याचा जुना वार्ड क्र.०३ जुना मालमत्ता क्र.२५०१/३ नवीन वार्ड क्र.०२ नवीन मालमत्ता क्र.४८७ वर बांधकाम परवानगी मिळण्याकरिता नगरपरिषद नोंदणीकृत आर्कीटेक्ट/इंजिनिअर यांचेद्वारे ऑनलाइन अर्ज सादर केला आहे.

जागेची रुंदी उत्तर-दक्षिण :-९.१४ मी
जागेची रुंदी पूर्व-पश्चिम :-१२.१९ मी.
जागेची चतु:सिमा उत्तर :-विक्री करणाराची जागा.
जागेची चतु:सिमा दक्षिण :-रोड २० फुट
जागेची चतु:सिमा पूर्वेस :-रोड २० फुट.
जागेची चतु:सिमा पश्चिमेस :-विक्री करणाराची जागा.

वरील चतु:सीमेतील जागेवर बांधकाम परवानगी देणेबाबत कोणाची काही हरकत असल्यास संबंधितानी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाचे आत मुख्याधिकारी, नगरपरिषद भोकर यांचेकडे दाखल करावी.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणताही उजर ऐकून घेतला जाणार नाही

मुख्याधिकारी
नगरपरिषद भोकर,जि.नांदेड

### नगरपरिषद, उमरी जि. नांदेड.

**जाहिरात प्रगटन**
**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

श्री कमलाकांत रामचंद्रराव उत्तरवार रा. उमरी सर्व्हे नं. २७/२ पैकी प्लॉट नं. ५० चा दक्षिणेकडील भाग, वार्ड नं. १५, झोन क्र. १, न.पा.मा.क्र. १३७/२, नवीन मालमत्ता क्र. १५३४ या जाहीर प्रगटनाद्वारे उमरी नगरवासियांना जाहीररित्या कळविण्यात येते की, बाबुराव बंकटलाल सारडा रा. उमरी यांच्या नावे असलेली मालकी हक्काची उमरी उमरी सर्व्हे नं. २७/२ पैकी प्लॉट नं. ५० चा दक्षिणेकडील भाग, वार्ड नं. १५, झोन क्र. १, न.पा.मा.क्र. १३७/२, नवीन मालमत्ता क्र. १५३४ ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पूर्वेस - ९ मीटरचा रस्ता, पश्चिमेस - राजेश भगवान यांचा प्लॉट, दक्षिणेस - ९ मीटरचा रस्ता, उत्तरेस - प्लॉट क्र. ५० चा भाग.

खरेदीखत बैनामा रजिस्ट्री / वाटणी पत्र क्र. ४३१ दि. १८/०३/२०२६ आधारे खरेदी केली आहे. वाटणीनुसार हिश्यास आली आहे. म्हणून नगरपालिकेच्या मालमत्ता रव्हिजन रजिस्टरमध्ये कमलाकांत रामचंद्रराव उत्तरवार यांच्या नावे नोंद घेण्यात येत आहे. ज्या कोणा नातेवाईक व हितसंबंधितांना वरील प्रमाणे नाव परिवर्तन होत असल्याबाबत आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप सबळ पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. नसता मुदत संपल्यानंतर अर्जदाराचे नाव मालमत्ता रिव्हीजन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, उमरी ता. उमरी जि. नांदेड**

### जाहिरप्रगटन

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली यांचे न्यायालय**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९८/२०२६
**रेखा व ईतर विरुध्द निरंक**

**अर्जदार :-**
१. रेखा पांडुरंग करडे, वय- ४२ वर्षे, रा. बडुर ता. बिलोली जि. नांदेड
२. सीमा नागनाथ प्यादेकर, वय- २६ वर्षे, रा. कासराळी ता. बिलोली जि. नांदेड
३. निर्मला देविदास प्यादेकर, वय- २० वर्षे, रा. कासराळी ता. बिलोली जि. नांदेड

**विरुध्द**
निरंक
विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत **पांडुरंग खाकु करडे** यांचे अर्जदार क्र. १ ही पत्नी व अर्जदार क्र.२ व ३ हया मुली आहेत. मयत हे मौजे बडुर ता. बिलोली जि.नांदेड येथील रहिवाशी आहेत. मयत **पांडुरंग खाकु करडे** यांचा मृत्यु दिनांक **दि.०८/१०/२०२४** रोजी मृत्यु झाला आहे. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत **पांडुरंग खाकु करडे** यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत **दिनांक १९/०६/२०२६** रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/ उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. १७ एप्रिल, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, बिलोली

### जाहीर प्रगटन

मौजे नसरतपूर ता.जि. नांदेड ग्राम पंचायत हद्दीतील शेत गट नं. ३६/ब/१ मधील अहिल्याबाई होळकर नगर मधील प्लॉट नं. १ ज्याची साईज लांबी - पूर्व - पश्चिम : १५.१२ मीटर व रूंदी दक्षिण - उत्तर : ८.०० मीटर ज्याचे एकूण क्षेत्रफळ १२०.९० चौ.मीटर म्हणजे १३०१ चौ. फुटाचा प्लॉट किशन नागोराव लोणे रा. लोणी बु. ता. अर्धापूर जि. नांदेड यांचे यांचेकडून सुनिता प्रमोद वाघमारे (कदम) रा. गीतानगर ह.मु. चंद्रगुप्तनगर/राजनगर ता.जि. नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतु:सिमा- पूर्वेस - ओपन स्पेस, पश्चिमेस - ९ मीटरचा रूंद रोड, दक्षिणेस - ओपन स्पेस व उत्तरेस - प्लॉट नं. २.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत सुनिता प्रमोद वाघमारे (कदम) यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करिता हे जाहीर प्रगटन.

जाहीर प्रगटन देणार
**सुनिता प्रमोद वाघमारे (कदम)**
**रा. गीतानगर ह.मु. चंद्रगुप्तनगर/राजनगर ता.जि. नांदेड**
**मो.नं. ९०९६३९३७८३**

### जाहिर प्रगठनाद्वारे कायदेशिर नोटीस

माझे पक्षकार हरिदास शेषेराव रोकडे वय - सज्ञान, धंदा - शेती, व प्रकाश शेषेराव रोकडे वय - सज्ञान धंदा शेती, दोघे रा.रामतीर्थ यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सर्व जनतेस या जाहिर प्रगठनाद्वारे कळवण्यात येते की,

मौ.रामतीर्थ ता.बिलोली येथील शेत गट क्र. ८३ मध्ये उध्दव अमृता रोकडे यांच्या नावे ३३ आर बळवंत अमृता रोकडे यांच्या नावे ६८ आर बाबाराव अमृता रोकडे यांच्या नावे ६८ आर आणि हरीदास शेषेराव रोकडे यांच्या नावे ७५ आर व प्रकाश शेषेराव रोकडे यांच्या नावे ७३ आर तसेच गट क्र. ९२ मध्ये बळवंत अमृता रोकडे यांच्या नावे ९७ आर, बाबाराव अमृता रोकडे यांच्या नावे ९५ आर संतोष विश्वांभर रोकडे यांच्या नावे ०१ हे ०१ आर व आनंद व्यंकट रोकडे यांच्या नावे ०१ हे २६ आर अशा प्रकारे जमिनी असुन, सदरच्या जमिनी ह्या वरील संपुर्ण शेतमालकाचे वडीलोपार्जीत मालमत्ता आहे. सद्या ज्या व्यक्तीच्या नावाने जेवढी वरील जमिन दर्शवण्यात आलेली आहे त्या जमिनी त्यांच्या कौटुबिक व्यवस्थापनेनुसार त्यांच्या नावे करण्यत आलेली आहेत. वास्तविक पाहता आजपर्यंत सदरील जमिनीमध्ये समसमानरित्या वाटनी झालेले नाहीत. त्यामुळे माझे पक्षकार वगळता वरील इतर लोक हे परस्पर रित्या त्यांच्या नावे जमिन असल्याचा फायदा घेवुन विक्री, गहाण, खंड अथवा इतर वेगवेगळ्या पध्दतीने आर्थिक तडजोडीचे व्यवहार करण्याच्या तयारीत असल्याचे माझ्या पक्षकारांना तशी माहिती मिळालेली आहे. म्हणुन सर्व जनतेस या जाहिर प्रगठनाच्या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदरील जमिनीशी कुणीही खरेदी विक्रीचा किंवा इतर कोणत्याही पध्दतीचे व्यवहार करु नये. यदाकदाचित तसे केल्यास ते स्वत: जबाबदार राहतील. व भविष्यात निर्माण होणाऱ्या संभाव्य परिस्थितीत सुध्दा ते स्वत: जबाबदार राहतील. म्हणुन सदरील जमिनीशी कुणीही व कसल्याही प्रकारची व्यवहार करु नये.

करीता या जाहिर प्रगठनाद्वारे सदरची कायदेशिर नोटीस देण्यात येते.

तर्फे,
23/4/26
ॲड.एम.के.म्हेत्रे
कोर्ट बिलोली

नोटीस देणार
हरिदास शेषेराव रोकडे
रा.रामतीर्थ ता.बिलोली जि.नांदेड
मो.क्र.7709408597

प्रकाश शेषेराव रोकडे
रा.रामतीर्थ ता.बिलोली जि.नांदेड

## Change In Name

My old Name is **SHAIKH FARAHNAJ SHAIKH** which now I am Changing as New Name **FARHANAZ SHAIKH MOHAMMAD ASHRAF.** Hence forth My All Correspondence will be done as Per my new name. Please consider the same.

Sign by - FARHANAZ SHAIKH MOHAMMAD ASHRAF Address : H.No. 5-2-59 Fatte Buruj Near Makka Masjid Chowk Bazar Itwara Nanded-431604 Mob 9022963060

## Change In Name

My old Name is **SHAIK MOHMMAD ASHRAF** which now I am Changing as New Name **SHAIKH MOHAMMAD ASHRAF.** Hence forth My All Correspondence will be done as Per my new name. Please consider the same.

Sign by - SHAIKH MOHAMMAD ASHRAF Address: H.No.5-2-59 Fatte Buruj Killa Road Itwara Nanded-431604 Mob 9022963060

## Change In Name

My old name is **AKHTAR BANU** which now I am changing as new name **AKHTAR BANU ABDUL GANI** Henceforth, all my correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Contact - AKHTAR BANU ABDUL GANI, H.No. 7-3-456, Sai Nagar, Nanded 431604 Cell: 9326098753

## Change In Name

My old name is **GAUSODDIN** which now I am changing as new name **GAUSODDIN ABDUL SAMAD** Henceforth, all my correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Contact - GAUSODDIN ABDUL SAMAD H.No. 7-3-456. Sal Nagar, Nanded 431604 Cell: 9326098753


## ऑफिसची जागा त्वरीत विकणे आहे.

नांदेड शहरातील मनपा अंतर्गत आनंदनगर येथील राज मॉल मधील ऑफिसची जागा क्र. २१० ज्याचे एकूण क्षेत्रफळ ७७२ चौ.फुट आहे. त्यामध्ये बाथरूमचा समावेश असून ही ऑफिसची जागा त्वरीत विक्री करणे आहे.इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.

**संपर्क नंबर**
**दिनेश कुलकर्णी** ९७६४१२३५९३
**तानाजी घोगरे** ७८४१८६५२८७

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# नांदेड दक्षिण मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी २४ कोटी ५० लाखांचा पीक विमा मंजूर

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड शहर व ग्रामीण विधानसभा मतदारसंघात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते. शेतकऱ्यांची झालेली दयनीय आर्थिक अवस्था लक्षात घेता आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी शेतकऱ्यांना पीक विमा मंजूर करण्याच्या अनुषंगाने विधानसभेत अनेक वेळा प्रश्न उपस्थित केला. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, २४ कोटी ५० लाख रुपयांचा विमा नांदेड शहर व ग्रामीणसाठी मंजूर करण्यात आला आहे.

## ◆ आ. बोंढारकरांच्या पाठपुराव्याला यश



यावर्षीच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते. यात नांदेड शहर व ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना मोठा फटका बसला होता. या भागातील ३१ हजार शेतकऱ्यांनी पीक विमा भरला होता. या शेतकऱ्यांना पीक विमा मंजूर झाला पाहिजे यासाठी आ. बोंढारकर यांनी राज्य शासनाकडे पाठपुरावा केला होता. अखेर बोंढारकरांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

२९ हजार शेतकऱ्यांना २४ कोटी ५० लाख रुपयांचा पीक विमा मंजूर करण्यात आला आहे. पीक विमा मंजुरीमुळे पात्र शेतकऱ्यांना लाभ होईल, असे आ. आनंदराव बोंढारकर यांनी सांगितले.

# अर्जीतसिंह चव्हाण खून प्रकरणातील मुख्य आरोपी साईलाला व नितेश इंगळेला पोलीस कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी)**–शहरातील तिहेरी खून प्रकरणातील फरार दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केल्यानंतर यातील मुख्य फरार आरोपी साईलाला यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने उत्तरप्रदेशातील वाराणसी येथून जेरबंद केले आहे. तो स्वतः वाराणसी पोलीस ठाण्यात हजर झाला होता. ट्रांजिस्ट वॉरंटवर त्याला नांदेडला आणण्यात आले आहे. या सोबतच त्याचा दुसरा साथीदार नितेश इंगळे यालाही पोलिसांनी अटक केली. या प्रकरणात एकूण आठ आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहेत.

नितेश इंगळे आणि साईलाला या दोघांना पोलीस निरीक्षक महेश माळी व त्यांच्या सहकाऱ्यांनी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना २८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत पाठवले आहे.



भाग्यनगर ठाण्याच्या हद्दीत ४ एप्रिल रोजी पहाटे कॅनाल रोडवर तिहेरी खून प्रकरणाची घटना घडली होती. यामध्ये आरोपी साईलाला, शाहरुख कबुतर, सोनू राऊत, आवेज सय्यद, महम्मद अरबाज, उबेद व साहेर यांनी जुन्या भांडणाच्या कारणावरून अर्जीतसिंह ऊर्फ प्रफुल्ल चव्हाण याच्या अंगावर चाकू व तलवारीने वार करून दहशत निर्माण करण्याकरिता खून करण्यात आला होता. त्यावरुन भाग्यनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून सदर गुन्ह्यातील सोनू राऊत, साहेर यांना अटक करण्यात आली होती. यातील आरोपींचा शोध घेत असताना सदर गुन्ह्यातील फरार आरोपी शेख शाहरुख ऊर्फ कबुतर शेख अजगर (वय २९) रा. खुदबेनगर चौरस्ता मेहबुबीया कॉलनी व शेख उबेद शेख अजगर (वय २३) रा. फेमस फंक्शन हॉल मिल्लतनगर यांना २० एप्रिल रोजी ताब्यात घेवून सदर गुन्ह्याबाबत विचारपूस केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिल्यावरुन त्यांना पुढील कारवाईकामी पोलीस स्टेशन भाग्यनगर यांच्या ताब्यात देण्यात आले. ते सध्या पोलीस कोठडीत आहेत.

दरम्यान यातील मुख्य आरोपी साईलाला उर्फ साईसिंह दीपकसिंह गहेरवार (वय २६) आणि त्याचा सहकारी नितेश परमेश्वर इंगळे (वय २२) हा गुन्हा केल्यापासून फरारच होता. दरम्यान पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिलेल्या आदेशावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाच्या पथकाने यातील फरार आरोपी साईलाला यास उत्तरप्रदेशातील वाराणसी येथून ताब्यात घेऊन त्याला नांदेडला आणण्यात आले आहे. सखोल चौकशी करून साईलाला याला भाग्यनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. तर इकडे भाग्यनगर पोलिसांनी त्याचा अन्य सहकारी नितेश इंगळे यालाही अटक केली. या दोघांनाही न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# उमरीमध्ये पत्नीचा खून तर हिमायतनगर तालुक्यात पत्नीला जिवे मारण्याचा प्रयत्न

**नांदेड (प्रतिनिधी)** –उमरी शहरातील बैल बाजार परिसरात पत्नीचा गळा दाबून खून केल्याची घटना घडली असून, तिकडे हिमायतनगर तालुक्यात वाशी येथे चारित्र्यावर संशय घेऊन पत्नीला ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या पतीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उमरी शहरातील बैल बाजार भागात राहणारी अंजली (वय २३) हिला पती कुठल्या ना कुठल्या कारणावरून त्रास देत असे. पैसे मागण्याच्या कारणावरून पती कृष्णा काशिनाथ गंटलवार (वय २५) याने २० एप्रिल रोजी रात्री नऊ ते दहाच्या सुमारास पत्नी अंजलीचा गळा दाबून खून केला. या प्रकरणाची फिर्याद राजू शेट्टी मडकलवार (वय ४०) राहणार कलंबर ता. कंधार यांनी उमरी पोलीस ठाण्यात दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, तपास पोलीस उपनिरीक्षक पोपलवार करीत आहेत.

तर तिकडे दुसऱ्या घटनेत हिमायतनगर तालुक्यातील वाशी येथे पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन पती विजय देविदास डवरे याने पत्नी चंद्रभागा विजय डवरे हिचा गळा दाबून खून करण्याचा प्रयत्न केला. ही घटना १८ एप्रिल रोजी दुपारी बाराच्या सुमारास वाशी शिवारात घडली. पीडित पत्नीच्या फिर्यादीवरून हिमायतनगर पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी पती विजय डवरे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक माने करीत आहेत.

# गुरुद्वारा तख्त सचखंड बोर्ड, नांदेडतर्फे ७१ व्या सामूहिक विवाह महोत्सवाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील गुरुद्वारा तख्त सचखंड बोर्डाच्या वतीने अत्यंत उत्साहात ७१ व्या सामूहिक विवाह महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा दि. २ आणि ३ मे रोजी होणार आहे.

या महोत्सवांतर्गत 'गुरु ग्रंथ साहेबजी भवन' येथे एकूण १३ जोडप्यांचा विवाह सोहळा धार्मिक विधीनुसार पार पडणार आहे. बोर्डाच्यावतीने सर्व संबंधित व्यक्तींना निमंत्रण पत्रिका पाठविण्यात आल्या आहेत. मात्र, तांत्रिक कारणास्तव किंवा वेळेअभावी ज्यांना निमंत्रण पत्रिका प्राप्त झाली नसेल, त्यांनी हेच अधिकृत निमंत्रण समजून या मंगल कार्यास उपस्थित राहावे, असे आवाहन गुरुद्वारा तख्त सचखंड बोर्डाच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'त्या' चार बालकांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २५ लाख रुपये देण्याची एमआयएमच्या नगरसेवकांची मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील इस्लामपुरा भागात एका डबक्यातील पाण्यात खेळण्यासाठी गेलेल्या चार बालकांचा मृत्यू झाला होता. या बालकांच्या कुटुंबियांना महापालिकेतील गुत्तेदाराने प्रत्येकी २५ लाख रुपयांची मदत करावी, अशी मागणी एमआयएमच्या नगरसेवकांनी केली आहे.

त्यानंतर एआयएमआयएमच्या १२ नगरसेवकांनी नांदेडच्या महापौर कविता मुळे यांना एक प्रस्ताव सादर करून या बालकांच्या कुटुंबियांना येत्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवून प्रत्येक कुटुंबाला २५ लाख रुपये आणि त्यांच्या कुटुंबियांमधील लोकांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार नांदेड- वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी नोकरी देण्याची मागणी केली आहे.

एआयएमआयएमचे प्रदेशाचे माजी अध्यक्ष सय्यद मोईन, मराठवाडा प्रमुख फिरोज लाला यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवक मोहम्मद अलताफ हुसेन, मोहम्मद मसुद अहेमद, सय्यद मुजीब, सय्यद फसीयोद्दीन, अब्दुल लतिफ, मोहम्मद नासेर, आशिया बेगम, सायना खानम, अश्विनी धोंगडे, शिफा तरन्नुम, मुस्कान नाज, शमिम बेग, अलकेसरी सुमय्या गुलफशा, बेबी शाहिस्ता, कुरेशी रिहाना बेगम यांनी एक प्रस्ताव तयार केला. या प्रस्तावानुसार प्रभाग क्रमांक ११ च्या हद्दीमधील इस्लामपुरा येथील विद्यार्थी मोहम्मद अदनान मोहम्मद फेरोज (वय १०), मोहम्मद अली मोहम्मद इद्रीस (वय १३) सय्यद इरफान सय्यद फेरोज (वय १३), अयान इब्राहिम बागवान (वय ११) हे चार विद्यार्थी शाळेतून परत येत असताना दि. १६ एप्रिल रोजी मोठ्या खड्ड्यात जमलेला पाण्याचा साठा पाहुन त्यात पोहण्यासाठी उतरले, पण दुर्देवाने त्यांचा मृत्यू झाला.

चारही मयतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २५ लाख रुपये महानगरपालिकेमार्फत अनुदान देण्यात यावे आणि मृत्यू पावलेल्या मुलांच्या कुटुंबियांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार महानगरपालिकेच्या आस्थापनावर कायमस्वरुपी नोकरी देण्यात यावी. सोबतच या मरण पावलेल्या वारसांना घरकुल या योजनेत घर तयार करून द्यावेत. हा आमचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवून मान्य करून देण्यात यावा असे निवेदनात नमूद केले आहे.

# श्रीमती सुंदरबाई बोधनकर यांचे निधन



**कुंडलवाडी(प्रतिनिधी)** – येथील ज्येष्ठ महिला श्रीमती सुंदरबाई माधवराव बोधनकर यांचे शुक्रवार, दि.२४ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. २५ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# सौ. संगमाबाई स्वामी यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**– औराद तालुक्यातील हंगरगा बु. येथील सौ.संगमाबाई नागय्यप्पा स्वामी हंगरगेकर यांचे हृदयविकाराने शुक्रवार, दि. २४ एप्रिल रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६० वर्षांच्या होत्या.

कै. संगमाबाई स्वामी यांच्या पार्थिवावर हंगरगा बुद्रुक येथे शुक्रवारी सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती नागय्यप्पा स्वामी, ३ मुली, २ मुले, सुना, जावाई, नातवंडे असा परिवार आहे.

# जिल्हा सहकारी बँक बिलोली शाखेच्या वास्तूचा आज लोकार्पण

**बिलोली (प्रतिनिधी)** –नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बिलोली शाखेच्या नवीन वास्तूचा लोकार्पण सोहळा शनिवार, दि. २५ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हस्ते होणार आहे.

जिल्हा बँक बिलोली शाखेच्या नूतन वास्तूचे उद्घाटक म्हणून सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची उपस्थिती राहणार आहे तर या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री तथा नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष भास्करराव पाटील खतगावकर हे राहणार आहेत.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खा. रवींद्र चव्हाण, राज्यसभा सदस्य खा. डॉ. अजित गोपछडे, बिलोली-देगलूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार जितेश अंतापूरकर, माजी आमदार तथा बँकेचे उपाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, विभागीय सहनिबंधक प्रवीण फडणीस, नृसिंह सहकारी सूतगिरणीचे उपाध्यक्ष बाळासाहेब पाटील खतगावकर, बिलोली मार्केट कमिटीचे सभापती रवीकुमार पाटील खतगावकर, कुंडलवाडी मार्केट कमिटीचे सभापती बाबाराव भाले, उपसभापती आनंदराव बिराजदार, उपसभापती साईनाथ निवळे आदी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अजय कदम व संचालक मंडळाने केले आहे.

# श्री लक्ष्मी नृसिंह (नरोबा) मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व श्रीराम कथेस प्रारंभ

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– बसवेश्वर नगर, जुना कौठा परिसर येथील श्री लक्ष्मी नृसिंह (नरोबा) मंदिर देवस्थान येथे दि. २४ एप्रिल ते १ मे २०२६ या कालावधीत १६ व्या वर्षी अखंड हरिनाम सप्ताह, श्रीराम कथा व श्री नृसिंह जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मंदिर संस्थान व कार्यकारिणी मंडळाच्या वतीने हा सप्ताह आयोजित करण्यात आला असून, आठ दिवस विविध धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी परिसर भक्तिमय होणार आहे. सप्ताह



दरम्यान पहाटे काकडा, अभिषेक, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, श्रीराम कथा, हरिपाठ तसेच दररोज रात्री हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहातील दैनिक कार्यक्रमानुसार पहाटे ५ ते ६ काकडा, सकाळी ६ ते ७ अभिषेक, सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी १० ते १२ गाथा भजन, दुपारी १ ते ४ श्रीराम कथा, सायंकाळी ५ ते ७ हरिपाठ तर रात्री ८.३० ते ११ या वेळेत हरिकीर्तन होणार आहे.दि. २४ एप्रिल रोजी ह.भ.प. गुरुवर्य योगीराज महाराज पैठणकर यांच्या हरिकीर्तनाने सप्ताहास प्रारंभ झाला.दि.२५ एप्रिल रोजी ह.भ.प.आशाताई राऊत लातूरकर यांचे हरिकीर्तन होणार असून, दि.२६ एप्रिल रोजी ह.भ.प. गुरुवर्य गुरुराज महाराज देगलूरकर, दि.२७ एप्रिल रोजी ह.भ.प.जगन्नाथ पाटील महाराज (भाषा प्रभू),दि.२८ एप्रिल रोजी ह.भ.प.ज्ञानोबा माऊली शिंदगीकर, दि. २९ एप्रिल रोजी ह.भ.प. भगवान महाराज म्हाळंगीकर तसेच दि.३० एप्रिल रोजी ह.भ.प. गणेश महाराज वारंगेकर यांचे हरिकीर्तन होणार आहे.

दि. १ मे रोजी सकाळी १० ते १२ काल्याचे कीर्तन ह.भ.प. गणेश महाराज वारंगेकर यांच्या उपस्थितीत होणार असून, दुपारी १२ वाजता महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे. या दिवशी श्री नृसिंह जन्मोत्सव सोहळा साजरा होणार आहे. मंदिर संस्थानच्या कार्यकारिणी मंडळात अध्यक्ष गंगाप्रसाद धोंडीबाराव काकडे, सचिव निळकंठ विठ्ठलराव काळे, सहसचिव बालाजी माधवराव सोनवळे, कोषाध्यक्ष देविदास नारायण डुबूकवाड, विश्वस्त रामदेव किशनगोपाल पंडित, तुलजासिंह नारायणसिंह गहेलोत व श्री रामप्रसाद छगनलाल शर्मा आदी पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

# रेल्वे पूल कामासाठी ट्राफिक ब्लॉक; काही गाड्या अंशतः रद्द व उशिरा धावणार

**नांदेड (प्रतिनिधी)**–दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात परभणी-मनमाड विभागातील पोटुल-दौलताबाद दरम्यान असलेल्या लेव्हल क्रॉसिंग क्र. ४१ येथे आरएच गर्डर बसविणे/काढणे या अभियांत्रिकी कामासाठी ओएचई पॉवर ब्लॉकसह ट्राफिक ब्लॉक घेण्यात येणार आहे.

२५ एप्रिल व २ मे २०२६ रोजी प्रत्येकी ३ तासांचे दोन ब्लॉक घेण्यात येणार असून त्याचा खालील गाड्यांवर परिणाम होईल. अंशतः रद्द करण्यात आलेल्या गाड्या : गाडी क्र. १७६८८ धर्माबाद-मनमाड मराठवाडा एक्स्प्रेस ही छत्रपती संभाजीनगर-मनमाड दरम्यान २५ एप्रिल व २ मे २०२६ रोजी अंशतः रद्द राहील. धर्माबाद ते छत्रपती संभाजीनगर अशी धावेल. गाडी क्र. १७६८७ मनमाड-धर्माबाद मराठवाडा एक्स्प्रेस ही मनमाड-छत्रपती संभाजीनगर दरम्यान २५ एप्रिल व २ मे २०२६ रोजी अंशतः रद्द राहील. या दिवशी छत्रपती संभाजीनगर ते धर्माबाद अशी धावेल. उशिरा धावणाऱ्या गाड्या: गाडी क्र. १२०७१ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-हिंगोली जनशताब्दी एक्सप्रेस ही पोटुल स्थानकावर सुमारे १५ मिनिटे थांबवण्यात येईल, असे कळविण्यात आले आहे.

# 'स्पोर्ट्स फिटनेस समर कॅम्प २०२६'चे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या संल्पनेतून विद्यार्थ्यांच्या शारीरिक तंदुरुस्ती व क्रीडा कौशल्य विकासासाठी 'स्पोर्ट्स फिटनेस समर कॅम्प २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग आणि फिजिकल एज्युकेशन फाउंडेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर राबवले जाणार असून, १ मे ते १५ मे या कालावधीत शिबिर पार पडणार आहे.

या उन्हाळी शिबिरात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर देण्यात आला असून विविध मैदानी व इनडोअर खेळांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. मैदानी खेळांमध्ये ॲथलेटिक्स, व्हॉलीबॉल, खो-खो, क्रिकेट, कबड्डी, बास्केटबॉल आणि हॉकीचा समावेश आहे. तर इनडोअर व इतर प्रकारांमध्ये जिम्नॅस्टिक्स, टेबल टेनिस, बॅडमिंटन, एरोबिक्स, बॉक्सिंग, योगा, वेटलिफ्टिंग तसेच फिजिकल फिटनेस प्रशिक्षण दिले जाणार आहे. शिबिराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सहभागी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाची भव्य खेळाची मैदाने व आधुनिक इनडोअर स्टेडियमची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. याशिवाय राष्ट्रीय स्तरावरील अनुभवी प्रशिक्षक व तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून खेळाडूंना मार्गदर्शन मिळणार आहे. शिबिरार्थ्यांसाठी मोफत बससेवा तसेच मोफत टी-शर्टचीही सोय करण्यात आली आहे.

५ ते १८ वर्षे वयोगटातील मुले व मुली यांना या शिबिरात सहभागी होता येणार असून, दररोज सकाळी ६ ते ९ या वेळेत प्रशिक्षण दिले जाईल. शिबिरासाठी प्रवेश शुल्क १५०० रुपये निश्चित करण्यात आले असून नोंदणीची अंतिम तारीख ३० एप्रिल आहे. हे शिबीर विद्यापीठ परिसरातील इनडोअर स्पोर्ट्स हॉल येथे आयोजित करण्यात येणार आहे.

नोंदणीसाठी इच्छुक पालक व विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करावी किंवा संबंधित पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन विद्यार्थी, पालक व शाळेचे मुख्याध्यापक यांना करण्यात आले आहे. उन्हाळी सुट्टीचा सदुपयोग करत मुलांच्या शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच क्रीडा कौशल्य विकसित करण्यासाठी ही उत्तम संधी असल्याचे डॉ. भास्कर माने, डॉ. भीमा केंगळे, डॉ. कुलजीत राणा व डॉ. पारस यादव यांनी सांगितले आहे.

# आ. कल्याणकर यांच्या प्रयत्नांतून पीरबुऱ्हाण येथे लवकरच महावितरणचे सबस्टेशन उभारणार

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड उत्तर मतदारसंघात मंजूर असलेल्या सबस्टेशनला महापालिकेच्या जागेमध्ये उभारण्यासाठी अखेर आ. बालाजीराव कल्याणकर यांचे प्रयत्न फळाला आले आहेत. पीरबुऱ्हाण येथील महानगरपालिकेच्या जागेवर हे सबस्टेशन स्थापन केले जाणार असून यासाठी महानगरपालिकेनेही हिरवा कंदील दाखवला आहे.

विजेची मागणी आणि पुरवठा यातील तफावतमुळे अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात वीज पुरवठा खंडित होतो आहे. ग्राहकांना खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याचा प्रचंड फटका बसतो आहे. ही परिस्थिती लक्षात घेता नांदेड उत्तर मतदार संघामध्ये सब स्टेशन बसविण्यात यावेत यासाठी आ. बालाजीराव कल्याणकर यांनी प्रयत्न केले होते. या प्रयत्नातून नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघात सबस्टेशन मंजूर करण्यात आले होते. मंजूर सबस्टेशन पीरबुऱ्हाण येथील महानगरपालिकेच्या जागेत उभारण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार महापालिकेकडे जागेची मागणी करण्यात आली होती. महापालिकेकडून त्या जागेसंदर्भात महावितरणला पत्र लिहून आम्हाला रेडी रेकनरच्या हिशोबाने जो भाव असेल त्या भावानुसार जमीन अधिग्रहित करावी. दिलासा म्हणून १०० टक्के रक्कम देण्यात यावी असे सांगितले होते. शिवाय महानगरपालिकेकडे महावितरणचे जे थकीत वीज बील बाकी आहे त्यातून सदरील रक्कम कपात करावी यासाठी सुरुवातीच्या काळात महानगरपालिकेने महावितरणकडे प्रस्ताव ठेवला होता. परंतु महावितरणने महानगरपालिकेची ही अट मान्य केली नाही. त्यामुळे पीरबुऱ्हाण येथील महानगरपालिकेच्या ४० गुंठे जमिनीवर हे सबस्टेशन उभारण्याचा प्रश्न रेंगाळत पडला होता. परंतु आ. बालाजीराव कल्याणकर यांनी याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी अप्पर मुख्य सचिव लोकेशचंद्र यांना आदेशित करून संबंधित प्रश्न मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार अप्पर मुख्य सचिव लोकेशचंद्र यांनी महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्याशी संपर्क साधला. सदरील जागा हा जनकल्याणासाठी वापरण्यात येणार असल्यामुळे शहरातील वीज वितरण व्यवस्थापन नीट होण्यासाठी आणि ग्राहकांना वीजपुरवठा सुरळीत होण्यासाठी महानगरपालिकेने १००% दिलासा रक्कम रद्द करावी. रेडी रेकनरच्या नियमानुसार जे दर होतील त्या हिशोबाने सदरील रक्कम महावितरणने थकीत बिलामधून वजा करावी आणि सबस्टेशन उभारण्यासाठी जागा द्यावी अशा सूचना दिल्या होत्या. या सूचनांना महानगरपालिकेच्या आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद देत अखेर सहमती दर्शवली. महावितरणकडून तसा प्रस्ताव सादर करावा अशा सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत. त्यामुळे महानगरपालिकेच्या पीरबुऱ्हाण येथील ४० गुंठे जमिनीवर हे सबस्टेशन लवकरच उभारण्यात येणार आहे. वीज पुरवठ्यासाठी उभारण्यात येणाऱ्या या सब स्टेशनमुळे नांदेड उत्तर भागातील वीज पुरवठ्यावर येणारा ताण कमी होऊन ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा होईल, असा विश्वास आ. बालाजीराव कल्याणकर यांनी व्यक्त केला आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com